नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'विदर्भ-साहित्य-संघा'चें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

आजच्या अंकांत—

* वा. वि. मिराशी
* श्री. ना. बनहट्टी
* कुसुमाग्रज
* कान्त
* सौ. शान्ता माडखोलकर

युगवाणी

वार्षिक वर्गणी
पांच रुपये
*
किरकोळ अंक
आठ आणे

संपादक: वामन नारायण देशपांडे

मार्च १९४६

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक ‘युगवाणी’
यवतमाळ [वऱ्हाड]

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्गणी, जाहिराती यासंबंधीं पत्रव्यवहाराचा पत्ता—
प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी एम्. ए.
सरचिटणीस,
वि. सा. संघ, अमरावती.

वर्ष १ लें
अंक ३ रा

मार्च १९४६

वार्षिक वर्गणी रु. ५
किरकोळ अंकास ॥-

अनुक्रमणिका

पृष्ठ

कविता—

१	मातीचें घर ...	कुसुमाग्रज ...	१
२	गाशिल का हें गान ? ...	कांत	२
३	जाणार कशी तूं ? ...	गुणवंत हणमंत देशपांडे	२
४	कवि आणि दीपक ...	बी. रघुनाथ ...	३
५	प्रेक्षका ! ...	दत्तात्रेय चिंतामण सोमण	३

साहित्यिकाचा परिचय—

१	स्वयंभू माडखोलकर ...	सौ. शांता माडखोलकर	४

प्रबंध—

१	गाथा सप्तशतीचा काळ	प्रिं. वा. वि. मिराशी ...	७
२	वृत्ति, कृति आणि अनुभूति	प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी ...	१७
३	महदंबेचे धवळे आणि नाथांचें रुक्मिणी स्वयंवर ...	प्रा. अ. ना. देशपांडे	२४

विविध—

१	गुप्त सरस्वती [साहित्यिकांचीं खाजगी पत्रें]	प्रा. ग. श्री. हुपरीकर यांचीं दोन पत्रें	२८
२	संपादकीय	... ...	३०
३	संघवार्ता	... ...	३२

चुकीची दुरुस्ती—

‘युगवाणी’च्या ‘Bee विशेषांकां’त पुढील दुरुस्ती करून घ्यावी—

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	२०	शेळलेचा	शेलेचा
७	[संस्कृत श्लोक १ ला ओळ ३]	जगच्चक्षुस्तदा	जगच्चक्षुस्तथा
७	सरते शेवटीं	विष्णु केशव पेशवे	विष्णु कृष्ण पेशवे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष १ लें अंक ३ रा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

मार्च १९४६

मातीचें घर

मातीचें पण तुझेंच हें घर
कर तेजोमय बलमय सुन्दर ! ध्रु०

आजवरी हें गमलें माझें
अन्ध अहन्ता हृदयीं गाजे
राखित बसलों मी दरवाजे
अशरणतेचे घालुनि अडसर ! १

कळलें आता परी मनोमन
दारावर मी केवळ परिजन
चैतन्याचें घरांतलें धन
तुझ्या पूर्तीचा मात्र असे कर ! २

तेज भरे जें ग्रह-नक्षत्रीं
प्रकाशतें जें दिवसा रात्रीं
जीवनमय जें करी धरित्री
कण त्याचा मम उजळी अन्तर ! ३

फुलांत उमलत, घनांत गर्जत
नदींत वाहत, वायुंत विहरत
तेंच तुझेंपण होय इथे स्थित
नच घर माझें तव हें मन्दिर ! ४

जरी भव्यता वैभव नोहे
आंत तुझें सिंहासन राहे
ये क्षणभर ये म्हण माझें हें
फुलवी गीतें सुनेपणावर ! ५

तिमिराने भरल्या एकान्तीं
लावी पळभर मंगल ज्योती
सुवर्ण होउनि धरतिल भिंती
काया तव हृदयीं जीवितभर ! ६

कुसुमाग्रज

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गाशिल का हें गान ?

१

गाशिल का हें गान, सखे तूं, गाशिल का हें गान ?
गळा कोवळा तुझा, मंजुळे, चंद्रकिरण जणु तान !
गाशिल का हें गान ?
मधुर मदिर तूं गीत गाइलें
पंछि मनोनीडांत जागले
व्यथित चक्रवाकापरि घाली हृदय-प्रीतिला आण !
असें ऐकिलें गान !

२

रूप यौवनीं स्फुरे कल्पना
शब्द फुटति मधु कळ्या-फुलांना
आलिंगन पाशापरि होती भावबंध निर्माण !
असें ऐकिलें गान !

३

इथे न ती तारुण्य-नव्हाळी
सर्व भुकेची आग भडकली !
आसुड उडतां, बेड्या वाजति, कंदे भूमि वितान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

४

गरल दर्प फूत्कार फणींचे
कुंड धगधगे मनिं सूडाचें
शब्द निखारे ते खवखवती, हृदयीं धूर भयाण !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

५

देशास्तव वनवासी झाले
न्यायास्तव फासावर चढले
अराजकांच्या अभिलाषांचें घुमतें येथ तुफान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

६

भुकेच मेले जे तडफडुनि
त्यांच्या थिजल्या त्या बुबुळांतुनि
तेज घेउनी येइ कल्पना तेजाळित अस्मान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

७

सण सण सुटति गोळ्या पवनीं
निरपराध ये रक्त उसळुनी
अरुण तयाचा गगनीं धावे उजळाया दिनमान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

८

अडवूं जुलमाचे रणगाडे
शिशु लोटिति निज तनु-सांगाडे
त्यांच्या पिचल्या मउ हाडांचें या ओळित आव्हान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

९

लज्जारूपा विवस्त्र केलें
यौवन-वस्त्राचि फाडुनि लुटलें
त्या लज्जेचे रंग वाहतां जळताचि रक्तसमान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

१०

बलशाली साम्राज्यें खचती
दलित करीं दिक्काल बदलती
त्या स्मरणाचें, त्या क्रांतीचें स्फुरे इथे ध्वजगान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

११

त्रिनेत्र तांडव करितो ज्या क्षणिं
झरे शशिसुधा, भडके अग्नी
त्या नाट्याचा अर्थ धराया शब्दपंक्ति गतिमान !
सखे, तूं गाशिल का हें गान ?

कान्त

जाणार कशी तूं ?

जाणार कशी तूं प्रियतम-सदना—
केल्याविण शृंगार-साधना ?

जायाचें तुज ठरलें तेथे
विश्रांतिस्थळ तुझ्या जिवाचें
यदृच्छेने राहि नियत जें
कां मग अशि विकलान्तःकरणा ? १

जीवन-यौवन-विकास-वैभव-
संप्राप्तीचा क्षण हा अभिनव
कातरता तरि अजुनि कशास्तव ?
शुभ घडि ही सावध हो अधुना ! २

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फूल कळीचें गंध फुलांतुनि
मिसळे परिमळ वातावरणीं
घेइ विकासश्रेणी समजुनि
आणुं नको विपरीत मना ! ३

विकास साफल्यास्तव म्हणुनी
रमणानंत—स्वांतीं मिळुनी
घेइ आत्म निर्वाण साधुनी
लेउं नको परि साज उणा ! ४

गुणवंत हनुमंत देशपांडे

कवि आणि दीपक

कविः— स्वभाव ज्या नारिचा जाळणें—
भरांत जळशी तिच्या मंदिरीं
भाग जागले-भ्रमच दीपका !
रूपरसा नच लुब्ध तुजवरी.

एकरात्र येणार खरोखर
विखरित सुषमा सुमशय्येवर
नको मीलनीं साक्ष म्हणोनी—
अधिर लाजरी वसेल फुंकर !

सुंदरतेच्या ध्यानीं निष्फळ
ऊर जाळुनी उरेल काजळ ! १

दीपकः— जळत जागशी रचित गात वा
मनोरमेवरि गीत मनोरम,
मला तरी सान्निध्य सखीचें
तुजला केवळ स्वप्न समागम.

काजळ माझें मज का लांछन ?
ज्वलनस्मृति मंदिरीं वागविल,
प्रसाधनीं कधि नयनीं रमुनी
द्वशर दाहक भेदक पराजिल.

दग्ध जरी मी विदग्ध राहुन
रूप सखीचें खुलविन-सेविन ! २

बी. रघुनाथ

प्रेक्षका !

वाऱ्याचे झोत येणारे जाणारे
जातां डोलवून चारी दिशांस
पळसांचीं फुलें, गुलमोहरांचा विपुल बहर,
तांबड्या लाल विजय-पताका
लागल्या आता फडफडावया
क्रांतिकारक ऋतु ग्रीष्माच्या !!

वन्हिसायक—रविकर—कोटि—
जळत आणि उजळवित
सारे चराचर
येऊन ठेपले मेदिनीवर !
बनलें भुवन दिव्य अग्निकुंड
पावकमय !

घालीत आडवे प्रचंड वृक्ष
कुंडांत इंधना
आणि उठवित, फिरवित स्तंभ
विराट, तांबूस, धूसर, गाढ
तप्त धूळींचे
(भासतात जे धूमाचेच लोट)
वारा तापलेला करी गर्जना
गभीर गूढ
(यज्ञदेवाचा चाले स्तुति-घोष !!)

दीपवीत दृष्टि धडकलें कुंड !
याच कुंडांतून परी यावयाची
याज्ञसेनी ती,
पंचभूतांची पांचाली दुजी,
पुष्पालंकारें भूषवून तनू
लेवून हिरवें मनोरम वस्त्र
लावण्यखनी, स्मित—वदना,
तोंवर धीर धर प्रेक्षका !

दत्तात्रय चिंतामण सोमण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वयंभू माडखोलकर

सौ० शांता माडखोलकर,
जी. ए.

बेळगावच्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष रा. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याविषयीं त्यांच्या सुविद्य पत्नी सौ० शांताबाई यांनी लिहिलेला हा लेख छोटेखानी असला, तथापि हृदयंगम आहे. पत्नीने आपल्या नामवंत पतीविषयीं असा लेख लिहिणें कौतुकाचें आहे, असें कोण म्हणणार नाही !

महाराष्ट्रांतील पुष्कळसे लोक माडखोलकरांना 'कादंबरीकार' म्हणून ओळखतात. त्यांच्या कादंबऱ्या वाचून त्यांच्याविषयीं अनेक कल्पना वाचकांच्या मनांत उत्पन्न होतात. त्यांना नेहमी येणाऱ्या अनोळखी वाचकांच्या पत्रांतून याचें प्रत्यंतर पाहावयाला मिळतें.

त्यांचें जीवन अत्यंत सुखासीन, विलासी आहे, अशीच बहुसंख्य वाचकांची समजूत आहे; तर कांहींची त्यांच्या लिहिण्याप्रमाणे बेछूट आहे, अशीहि आहे. कांही वर्षांपूर्वी मुंबई रेडियोवर 'दुहेरी जीवन' कादंबरीचें नाट्य करण्यांत आलें, होतें. त्यावेळीं 'दुहेरी जीवना'चा नायक माडखोलकरांच्या जीवनाचा प्रतिबिंब असावा, असें वाटून प्रा. गजेंद्रगडकर यांनी त्यांना त्याबद्दल खुलासा विचारला होता. त्याचप्रमाणे, त्यांच्यावर होणाऱ्या टीकांतून आणि खाजगी संभाषणांतूनहि त्यांच्या चारित्र्याविषयीं शंका व्यक्त केल्या जातात. इतकेंच नव्हे, तर एका तरुण मुलीने माझ्या देखत, आपल्याला माडखोलकरांचें जीवन माहीत असून, 'दुहेरी जीवना'च्या नायकासारखेंच तें आहे, असें ठासून दुसऱ्याला सांगतांना मीं ऐकलें आहे !

पण, ज्यांचा माडखोलकरांशीं निकट संबंध आहे, त्यांना मात्र हें नक्की माहीत आहे की, त्यांच्या कादंबऱ्यांतील श्रीमंतीचा आणि सुखविलासाचा त्यांच्या जीवनाशीं कांही संबंध नाही. लेखनांतील सौंदर्यदृष्टीचा आणि नीटनेटकेपणाचा मागमूसहि त्यांच्या रोजच्या जीवनांत आढळावयाचा नाही. जुन्या काळच्या वस्त्रांच्या विणींत असा एक रंग-वैचित्र्याचा मजेदार प्रकार असे की, लुगडें एका बाजूने हिरवें, तर दुसऱ्या बाजूने लाल दिसावें. तशीच कांहींशी अवस्था माडखोलकरांच्या जीवनाची आहे. त्यांत हौशीला किंवा कलाविलासालाच काय पण पुरेशा विश्रांतीलाहि वाव नाही ! 'महिन्यांतून तुम्ही कितीदा सिनेमा पाहतां ?" असें त्यांना विचारण्याऐवजीं "वर्षांतून तुम्ही एकदा तरी सिनेमा पाहतां का ?" असें विचारण्याचा प्रसंग त्यांच्या मित्रांवर येतो ! याचें कारण यंत्रासारखी सतत करावी लागणारी धडपड. सकाळीं सहापासून रात्रीं दोनपर्यंत त्यांचें काम सारखें चालू असतें. ते पुष्कळदा म्हणतात, "माझ्याकडे माणसें येतात तीं आपल्या कामासाठी येतात. स्टेशनवर उभ्या केलेल्या यंत्रांत आणा टाकला की, त्यांतून तिकीट बाहेर येतें. तशी माझी स्थिति आहे पण मला मात्र आणाहि द्यावा लागत नाही." पण इतके श्रम करूनही काळजी आहेच. कारण त्यांनी स्वीकारलेला आयुष्यक्रम कष्टाचा पण कमी पैसा देणारा आहे. 'महाराष्ट्रां'त अठरा वर्षे नोकरी करूनहि त्यांचा पगार कधी शंभरापर्यंत पोचला नाही, हें ऐकून अनेकांना नवल वाटतें. त्यांच्या कादंबऱ्यांनीच खरोखरी त्यांचा संसार सावरला. नाही तर आमच्या दैन्याला सुमार राहता ना !

आपल्या अंतःकरण-प्रवृत्तीला प्रमाण मानून आपण चालतों, असें ते नेहमी म्हणतात. पण त्यामुळे त्यांच्या मनाला कितपत समाधान झालें आहे, तें मी सांगू शकत नाहीं. समाधानाच्या आणि सुखाच्या कल्पना प्रत्येकाच्या भिन्न असतात, हेंच

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खरें ! ' महाराष्ट्राचें एकीकरण ' हें त्यांचें जीवनस्वप्न आहे. वयाच्या पंधराव्या वर्षापासून त्याच्या सफलतेचा उद्देश डोळ्यांपुढे ठेवून ते चालत आलेले आहेत. एवढ्यासाठी हैद्राबाद संस्थानांतील मराठवाडा साहित्य-परिषदेच्या कार्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. त्यांना प्रवासाचा मनस्वी कंटाळा आहे व अनोळखी ठिकाणीं उतरणें म्हणजे त्यांना प्राणसंकट वाटतें. पण, मराठवाड्याच्या साऱ्या जिल्ह्यांतून मिळेल त्या वाहनाचा उपयोग करून कमींत कमी खर्चात दौरा करण्याचें त्यांनी ठरविलें; व औरंगाबाद आणि नांदेड या दोन जिल्ह्यांतील लहानसहान गावांनाहि भेटी दिल्या. दौऱ्याला खर्च कमी यावा, म्हणून तिसऱ्या वर्गाच्या भाड्याशिवाय त्यांनी कधीं कांहीं घेतलें नाहीं. त्यामुळेच हैद्राबाद संस्थानांतील कार्यकर्त्यांची त्यांच्यावर इतकी भक्ति आहे.

तरुण पिढीला त्यांच्याविषयीं आदर वाटतो तोहि त्यांच्या गुणग्राही स्वभावामुळे. स्वतःला विसरून ते तरुणांत मिसळतात व त्यांच्या इच्छा-आकांक्षा समजून घेण्याचा प्रयत्न करतात. अडचणींच्या प्रसंगीं हात देऊन त्यांनी अनेक तरुणांना उत्कर्षाच्या मार्गाला लाविलें आहे. कोणाच्याहिविषयीं कसल्याहि प्रकारचा दंश मनांत न ठेवतां शक्य तितकें उपयोगी पडत राहावयाचें, अशी आपली वृत्ति त्यांनी अभ्यासपूर्वक बनविली आहे. मात्र दुसऱ्याला होतांहोईतों न दुखविण्याचा त्यांचा स्वभाव असला, तरी स्वतःच्या मताच्या बाबतींत ते अतिशय काटेकोर आहेत. महाराष्ट्राचे संपादक कै० दादासाहेब ओगले किंवा ' तरुण-भारता'ची चालक मंडळी यांनी त्यांच्या या स्वभावाची धार ओळखली आहे, म्हणूनच खरोखरी त्यांचें निभलें आहे. नाहीतर, ते केव्हा हट्टाला पेटून केव्हा बाहेर पडतील, याचा नेम नाही. कै. दादासाहेब ओगल्यांनी लिहिण्याच्या बाबतींत त्यांना कधी अवाक्षरानेंहि हटकलें नाहीं. त्यामुळेच त्यांनी अल्प वेतनावर 'महाराष्ट्रां'त अठरा वर्षे मोठ्या हौसेनें काम केलें. ' तरुण भारत ' हा आपल्या नांवावर निघतो आणि 'महाराष्ट्र ' हा आपल्या नांवावर निघत नव्हता, म्हणून त्यांनी कधी कष्टांत फरक केला नाहीं. त्यांचें वृत्तव्यवसायांतलें यश हें त्याच्या

बेळगाव म. सा. सम्मेलनाचे अध्यक्ष

रा. ग. त्र्यं. माडखोलकर

अपरिमित कष्टांचेंच खरोखरी फळ आहे. ते नेहमी म्हणतात, 'गेलीं बावीस वर्षे मी इतके कष्ट करीत आलों आहें कीं, रोजच्या कामाचें माप जर शिगोशिग भरलें नाहीं, तर मला सुखानें अन्न जाणार नाहीं. '

दिवसभर इतके कष्ट करूनहि अप्रसन्नता अशी त्यांच्या ठिकाणीं कधी आढळणार नाही. त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारचा मिजासखोरपणा नाहीं. गर्भश्रीमंत घराण्यांत जन्म घेऊनहि म्हणण्यासारख्या स्वभावाच्या किंवा आवडीनिवडीच्या खोडी त्यांना नाहींत. पत्त्यांतील राजाराणींशीं देखील त्यांची ओळख नाहीं. मग इतर खेळ दूरच राहिले ! चहा सोडल्यास कशाचीहि गरज नाहीं. लिहावयाला निवांतपणा किंवा सुसज्ज खोली लागत नाहीं. पॅड्स् किंवा फाउंटन पेन हींहि त्यांना माहीत नाहींत. पाठकोरे कागद, शाळकरी मुलांची दौत आणि मराठी निबेचा साधा टाक एवढ्यावर त्यांचें भागतें. शेजारीं पिठाची चक्की चाललेली असली, किंवा छपाईच्या यंत्राचा धडाका चालू असला, तरी त्यांची समाधि भंग पावत नाही. त्यांना व्यसन असलेंच, तर तें वाचण्याचें, लिहिण्याचें आणि माहिती मिळविण्याचें आहे. प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय किंवा खात्रीलायक माहिती मिळाल्याशिवाय त्यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोणत्याहि गोष्टीचा उपयोग लेखनासाठी केलेला नाही. निव्वळ काल्पनिक असें त्यांच्या लिखाणांत कांहीहि नाही. जें प्रत्यक्ष पाहिलें आहे, किंवा मनाला पटलें आहे, तेंच त्यांनी वर्णन केलें आहे.

त्यांच्या आयुष्यांत खाजगी असें कांही नाहीं. 'तरुण भारत' कचेरी आणि आमचें घर यांत कोणत्याच प्रकारचें अंतर नाही. दिवसाच्याच केवळ नव्हे, तर रात्रींच्या सुद्धा कोणत्याहि प्रहरीं ते कोणालाहि भेटावयाला तयार असतात. त्यामुळे घराला धर्मशाळेची कळा आली आहे! सर्व पक्षांचे, सर्व जातींचे आणि सर्व धर्मांचे मित्र त्यांना आहेत व त्यांचें आतिथ्य समदृष्टीने केलें जातें. घरांत पाहुणा आला, तरी त्यामुळे त्यांच्या नित्यक्रमांत खंड पडत नाही. त्यांच्याशीं गप्पाच मारावयाच्या झाल्या, तर रात्रींचा झोपेचा वेळ ते खर्ची घालतील. त्यांना जात्याच झोप कमी, त्यांतून 'तरुण भारत' निघाल्यापासून झोपेचें प्रमाण चार-पांच तासांवर आलें आहे. रोज नेमाने योगासनें करून जरी त्यांनी आपली दर्शनी प्रकृति उत्तम ठेवली असली तरी अलीकडे त्यांचे डोळे झपाट्याने बिघडत चालले आहेत. 'तरुण भारत' सुरू झाल्यापासून गेल्या अडीच वर्षांत डॉ. भिडापूरकर यांनी त्यांना तीन वेळां चष्मा बदलावयाला लावला आहे!

माडखोलकरांचा एकंदर स्वभाव आणि परिस्थिति पाहिली, म्हणजे ते सर्व बाबतींत 'स्वयंभू' आहेत, असें मला वाटतें. न शिक्षण, न पदवी, न पैसा, न कोणाचा वशिला किंवा पाठिंबा-अशा स्थितींतहि हरएक बाबतींत पावलोपावलीं होत असलेला विरोध कापून ते ज्या वेगाने आणि तेजाने पुढे आले, तें खरोखरीच आश्चर्यकारक आहे. त्यांचे सगळे गुण किंवा दोष जे काय असतील, ते स्वयंप्रकाश आहेत. ज्या आपल्या गुरूंची ते इतकी स्तुति करतात, त्यांच्यापासून त्यांनी काय घेतलें, हें अद्यापि कोणाला कळलेलें नाही; व 'महाराष्ट्र' कचेरींत जरी त्यांनी अठरा वर्षे काढलीं, तरी दैनिकाचा अनुभव नसतांहि 'तरुण भारता' चा जो जम दीड वर्षांत त्यांनी बसविला, तोहि त्यांच्या स्वयंभूपणामुळेच! या स्वयंभूपणाबरोबरच स्वच्छंदीपणाहि त्यांच्यांत आलेला आहे. त्यामुळेच कोणत्याहि पक्षाच्या साच्यांत ते बसूं शकत नाहीत. त्यांच्या लिहिण्या-वागण्यांत जी धार, जें वैशिष्ट्य, जी कल्पकता आणि जो विलक्षण मानीपणा आहे, तो याचमुळे असावा. जबलपूरचे रा. काकासाहेब लेले यांनी त्यांचें वर्णन "मनस्वी, तेजस्वी आणि यशस्वी"-या तीन विशेषणांनी केलें होतें तें खरेंच आहे. ते जर मनस्वी आणि तेजस्वी नसते, तर यशस्वीहि झाले नसते!

आपल्याला 'टीकाकार' म्हणून मान्यता मिळाल्याबद्दल किंवा 'कादंबरीकार' म्हणून लोकप्रियता मिळाल्याबद्दल त्यांना कधी अभिमान वाटला असेल, असें मला वाटत नाही. स्वतःच्या लिखाणाविषयीं ते सहसा बोलत नाहीत. आणि, 'तरुण भारत' सुरू झाल्यापासून तर त्यांच्या वाढत्या व्यापामुळे आपण ललितलेखक असल्याचाहि विसर त्यांना अलीकडे पडला आहे! त्यांना जर अभिमान कशाबद्दल वाटतच असेल, तर तो फक्त 'तरुण भारत' अवघ्या दोन वर्षांत उत्तम रीतीने यशस्वी केल्याबद्दल. त्यांच्यावर पडत असलेला कामाचा बेसुमार ताण पाहून मीं एखादे वेळीं तक्रार केली, म्हणजे ते मला म्हणतात, 'तुझ्यासाठीं मीं कादंबऱ्या लिहिल्या आणि त्या कादंबऱ्यांनी आपला संसार सांभाळला; पण 'तरुण भारत' हा माझ्या ईर्षेमुळे निघालेला आहे. त्याचें यश हीच मी माझ्या आयुष्यांतील सगळ्यांत अभिमानास्पद गोष्ट समजतों!"

पण, यावर मला एवढेंच विचारावेंसें वाटतें की, त्यांनी जर कादंबऱ्या लिहिल्या नसत्या, आणि ते जर नुसते दैनिकाचेच संपादक असते, तर महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला असता काय?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गाथासप्तशतीचा काळ

महामहोपाध्याय
प्रिन्सिपाल वा. वि. मिराशी

महामहोपाध्याय वि. मिराशी हे इतिहाससंशोधक म्हणून हिंदुस्थानभर प्रसिद्ध आहेत. ताम्रपट व शिलालेख यांचें पद्धतशीर वाचन व संपादन करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. बिनचुकपणांत ते थोरल्या भांडारकरांची आठवण करून देतात. त्यांचे संशोधनविषयक लेख रुक्ष न वाटतां चटकदार वाटतात, हा त्यांचा महनीय विशेष आहे.

अविनाशिनमग्राम्यमकरोत्सातवाहनः ।
विशुद्धजातिभिः कोशं रत्नैरिव सुभाषितैः ॥

[एखादा राजा अत्यंत शुद्ध जातीच्या रत्नांनी खेडेगावांत न होणारा असा अक्षय्य निधि करतो, त्याप्रमाणे सातवाहन राजाने अत्यंत निर्दोष अशा व जातिछंदांत रचलेल्या सुभाषितांनी अविनाशी व सोज्वळ असा कोश केला.]

प्राकृत वाङ्मयांत गाथासप्तशती किंवा सत्तसई हें काव्य फार प्राचीन गणलें जातें. या ग्रंथांत सातशें प्राकृत गाथांचा संग्रह आहे. याचा कर्ता हाल किंवा सातवाहन होता, अशी प्रचलित समजूत आहे. पुराणांत तीस (कांहीं पाठांत एकतीस) आन्ध्र राजांची वंशावळ काल-निर्देशासह आली आहे, तिजमध्ये हालाचें नांव आहे. तेव्हा हाल हा आन्ध्र राजवंशांतील असावा असें मानतात. पुराणांतील निर्देशावरून आन्ध्रांनी सुमारें साडेचारशे वर्ष राज्य केलें असें दिसतें. हा काळ खरा असल्यास, सुमारें ख्रिस्तपूर्व २०० पासून ख्रिस्तोत्तर २५० वर्षापर्यंत आंध्रांनी दक्षिणेंत राज्य केलें असावें. कारण आन्ध्रांनंतर आभीर राजे उदयास आले, असें पुराणें सांगतात. आभीरांनी आपला स्वतंत्र शक चालू केला होता. त्याचा आरंभ इ. स. २५० च्या सुमारास होतो. तत्पूर्वी साडेचारशे वर्षें आंध्रांनी राज्य केलें असल्यास त्यांचा उदय ख्रिस्तपूर्व २०० च्या सुमारास झाला असला पाहिजे, हें उघड आहे.

पुराणांच्या वंशावळींत हालाचें नांव सतरावें आहे. पुराणांत प्रत्येक राजाच्या कारकीर्दींचीं वर्षें दिलीं आहेत. त्या बाबतींत सर्व पुराणांचीं एकवाक्यता नाही. तथापि त्यांतल्या त्यांत उत्तम असे पाठ घेऊन गणना केली, तर हाल हा आन्ध्र साम्राज्य स्थापनेनंतर २८१ वर्षांनी–[१] म्हणजे ख्रिस्तोत्तर ८१ वर्षांच्या सुमारास–गादीवर आला, असें दिसतें. त्याने फक्त पांच वर्षें राज्य केलें, असें पुराणांत म्हटलें आहे.

तेव्हा गाथासप्तशती इ. स. च्या पहिल्या शतकांत झाली असावी. कांही विद्वान संशोधक, आंध्रांचा उदय काण्व राजांच्यानंतर ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत झाला, असें मानतात. राजांच्या कारकीर्दींच्या वर्षांतहि कांही मतभेद आहेत. त्यामुळे कांहींच्या मतें हाल हा इ. स. च्या दुसऱ्या शतकांत होऊन गेला असावा.

गाथासप्तशतींत अनेक महत्त्वाचे उल्लेख आले आहेत. मंगळवाराचा अनिष्ट वार म्हणून उल्लेख, विक्रमादित्याच्या दातृत्वाचें वर्णन, राधाकृष्ण व कृष्ण-गोपी यांच्या लीला, गजाननाचा पराक्रम इत्यादिकांचें वर्णन सप्तशतींत आलें असल्यामुळे व तिचा काळ सामान्यतः निश्चित असल्यामुळे वादग्रस्त विषयांच्या विवेचनांत सप्तशतींतील गाथांचा पुरावा

१ पाजिटरकृत कलियुगांतील राजवंश [इंग्रजी] पृ. ३८–४१ पाहा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कालनिर्णयार्थ दिला जातो; व अमुक एका देवतेचा, व्यक्तीचा किंवा प्रसंगाचा उल्लेख सप्तशतींत आला आहे, तेव्हा ती देवता व व्यक्ति किंवा तो प्रसंग इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकापूर्वी लोकप्रसिद्ध होता, असें अनुमान करण्यांत येतें. उदाहरणार्थ, अलीकडे विक्रमद्विसहस्राब्दी-महोत्सवाच्या प्रसंगानें लिहिलेल्या लेखांत ' संवाहणसुहरसतोसिएण— ' इत्यादि ४६४ व्या गाथेंत[2] वर्णन केलेला विक्रमादित्याच्या दातृत्वाचा उल्लेख अनेक लेखकांनी केला होता व त्यावरून ' कालिदासाचा आश्रयदाता सुप्रसिद्ध विक्रमादित्य नृपति हा इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकापूर्वी होऊन गेला असला पाहिजे; त्यानेच खिस्तपूर्व ५८ व्या वर्षी आपल्या नांवें संवत्सर सुरू केला; तो विक्रमादित्य खिस्तोत्तर चौथ्या शतकांत होऊन गेलेला विख्यात गुप्तसम्राट द्वितीय चन्द्रगुप्त असणें शक्य नाही ' इत्यादि अनुमानें काढलीं होतीं. तसेंच, गजानन ही देवता किती जुनी आहे, याविषयीं मागे 'सरस्वतीमंदिर' व 'विविधज्ञानविस्तार' या मासिकांत वादविवाद झाला होता, त्यांतहि सप्तशतीच्या ४०३ या गाथेंतील गजाननाच्या वर्णनाचा निर्देश करून, ' गजानन ही देवता निदान पंधराशे ते अठराशे वर्षांइतकी जुनी आहे ' असें प्रतिपादण्यांत आलें होतें. या विषयाच्या विवेचनाच्या प्रसंगानें विद्याभूषण पं. कृष्णशास्त्री घुले यांनी 'वागीश्वरी' मासिकाच्या पहिल्या वर्षाच्या प्रथमांकांत गाथा-सप्तशतीच्या कालासंबंधानें एक विद्वत्ताप्रचुर लेख लिहिला होता. त्यांत त्यांनी सप्तशतीचा कर्ता हाल हा राजा नसून गोदावरीतीरींचा एक गरीब खेडवळ ब्राह्मण होता आणि तिच्यांत आलेल्या अनेक उल्लेखांवरून तिचा काळ सहाव्या शतकापूर्वी जाऊं शकत नाही, असें प्रतिपादिलें होतें. पुढे घुले शास्त्र्यांच्या प्रमाणांचें परीक्षण नागपूर येथील विद्वान् संशोधक श्री. अप्रबुद्ध यांनी 'वागीश्वरी'च्या तिसऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकांत सविस्तर व निर्भीडपणें करून 'सप्तशतीच्या गाथांना बेधडक दुसऱ्या शतकांत ठेवतां येईल', असा आपला सिद्धांत मांडला होता व त्याला पं. घुले शास्त्र्यांचें उत्तर त्याच मासिकाच्या त्या वर्षाच्या सहाव्या अंकांत आलें होतें. हा वाद मूळ गजानन ही देवता किती जुनी आहे, या प्रश्नाच्या निमित्तानें झाला होता. त्या प्रश्नाशीं सध्या आपणांस कांही कर्तव्य नाही. तथापि अशा वादग्रस्त प्रश्नांच्या निर्णयार्थ सप्तशतींतील गाथांचा पुरावा दिला जातो, तेव्हा सप्तशतीचा काळ निश्चित करतां आल्यास त्या व तत्सम इतर प्रश्नांच्या निर्णयास मदत होईल, असें वाटून त्याचें विवेचन प्रस्तुत लेखांत केलें आहे.

गाथासप्तशती किंवा सत्तसई या प्राकृत ग्रंथाचा कर्ता हाल होता, ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. या ग्रंथाच्या तिसऱ्या गाथेंत[3] कविवत्सल हालानें एक कोटी गाथांमधून सातशें गाथा निवडून काढून रचल्या, असें म्हटलें आहे. या गाथेंत ' विरइआइं ' (विरचितानि) या पदाचा उपयोग केला असला, तरी या सर्व गाथा हालानें स्वतः रचल्या नसून, त्या त्यानें अनेक गाथांतून निवडून ग्रथित केल्या, हें या गाथेंतील वर्णनावरूनच स्पष्ट आहे. या ग्रंथावर झालेल्या तेरा टीका सध्या उपलब्ध आहेत. त्यांत कित्येक गाथांच्या संबंधांत तत्कर्त्या कवींचीं नांवें आलीं आहेत. आरंभीं प्रत्येक गाथेशीं तिच्या कर्त्याचें नांव संलग्न होतें, असें दिसतें. पण कालांतरानें त्यांतील कांही नांवें लुप्त झालीं व कांहींच्या बाबतींत घोटाळा झालेला दिसतो. शिवाय हस्तलिखित प्रतींवरून या ग्रंथाचे निदान सहा पाठ झाले आहेत, असें दिसतें. सर्व पाठांत ४३० गाथाच समान आहेत. बाकीच्या फक्त कांही पाठांतच दिसतात. हाल हा राजा होता, असें सप्तशतींत कोठे म्हटलें नाही खरें, पण तशी परंपरागत समजूत होती, यांत संशय नाही. कारण संस्कृत व प्राकृत कवींनी त्याच्या स्तुतिपर जे अनेक

२ गाथांच्या पाठांत व अनुक्रमांत हस्तलिखित प्रतींत, निर्णयसागराच्या आवृत्तींत व श्री. जगदीशलाल यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आवृत्तींत पुष्कळ फरक आढळतो. निर्णयसागरप्रत सर्वांस सहज उपलब्ध असल्यानें प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेल्या गाथांचे अनुमकांक त्या आवृत्तीप्रमाणे दिले आहेत.

३ सत्त सताइं कइवच्छलेण कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं सालंकाराणं गाहाणं ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्लोक केले, त्यांत तसा उल्लेख आहे. उदाहरणार्थ, सोड्ढलाच्या उदयसुन्दरींतील खालील श्लोक पाहा—

“ हाले गते गुणिनि शोकभरान्धभूरुच्छिन्नवाङ्मयजडाः कृतिनस्तथामी ।
यत्तस्य नाम नृपतेरनिशं स्मरन्तो हृत्यक्षरं प्रथममेव परं विदन्ति ”

यांत हाल हा नृपति होता, असें स्पष्ट म्हटलें आहे. हालाचा कवींना उदार आश्रय होता. कवींचा सुभाषितसंग्रह प्रकाशांत यावा म्हणून त्याने आपला कोश भरला होता, असें अभिनन्द कवीने स्वतःच्या आश्रयदात्या हारवर्ष राजाची स्तुति करतांना म्हटलें आहे.

नमः श्रीहारवर्षाय येन हालादनन्तरम् ।
स्वकोषः कविकोषाणामाविर्भावाय संभृतः ॥

या कवींमध्ये श्रीपालित नांवाचा कवि प्रमुख होता व तो हालाच्या दरबारीं राजकवि होता, असें दिसतें. कारण अभिनन्द कवि म्हणतो —

हालेनोत्तमपूजया कविवृषः श्रीपालितो लालितः
ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना ।
श्रीहर्षो विततार गद्यकवये बाणाय वाणीफलम्
सद्यः सत्क्रिययाभिनन्दमपि च श्रीहारवर्षोऽग्रहीत् ॥

यांत वर्णिलेल्या शकारि विक्रमादित्य, श्रीहर्ष व हारवर्ष या राजांप्रमाणे हाल हाहि राजा होता, यांत संशय नाहीं. पालित कवीच्या कांहीं गाथा सप्तशतींत घेतलेल्या आढळतात. त्याने हालनृपतीस गाथांचा संग्रह व निवड करण्यास मदत केली असावी. हा हाल राजा गोदावरी तीरीं प्रतिष्ठान येथे राज्य करीत होता, हें ‘ वज्जालग्गम् ’ नामक दुसऱ्या एका प्राकृत ग्रंथांतील खालील गाथेवरून दिसून येईल.

पुरिसविसेसेण सइत्तणाइं न कुलक्कमेण महिलाणं ।
सग्गं गए वि हाले न मुयइ गोला पइट्ठाणं ॥
वज्जालग्गम्, ४६८

(उत्तम पुरुषांच्या संगतीमुळे स्त्रिया सती होतात केवळ कुलक्रमामुळे नव्हे. कारण हाल स्वर्गाला गेला, तरी गोदावरी कांहीं प्रतिष्ठान (पैठण) नगर सोडत नाहीं.) या हालाचेंच सातवाहन (प्राकृत सालाहण) असें दुसरें नांव होतें, असें हेमचन्द्राने आपल्या कोषांत सांगितलें आहे. ‘ हालः सातवाहनपार्थिवे ’ (हेमकोष) व ‘ सालाहणम्मि हालो ’ (देशीनाममाला) हीं वचनें पाहा. बाणाने आपल्या हर्षचरिताच्या आरंभीं एका श्लोकांत सातवाहनाच्या सुभाषितसंग्रहाची स्तुति केली आहे. तो श्लोक प्रस्तुत लेखाच्या आरंभीं दिला आहे. हा सुभाषित–संग्रह म्हणजे गाथा सप्तशतीच होय असें समजलें जातें. प्रसिद्ध संस्कृत कवि राजशेखर याने प्राचीन संस्कृत व प्राकृत कवींच्या स्तुतिपर अनेक श्लोक रचले होते. त्यांमध्ये सातवाहनाविषयीं पुढील श्लोक आला आहे.

जगत्यां प्रथिता गाथाः सातवाहनभूभुजा ।
व्यधुर्धृतेस्तु विस्तारमहो चित्रपरम्परा ॥

(या जगांत सातवाहनाने गाथा अनेक ठिकाणाहून जमवून एकत्रित केल्या; पण त्यायोगें लोकांचा आनंद संकुचित न होतां विस्तार पावला ! काय ही आश्चर्याची परंपरा !)

यांत उल्लेखिलेल्या गाथाहि सप्तशतींतीलच असल्या पाहिजेत. ‘ प्रथिता ’ या पदाने राजशेखराने सूचित केलें आहे की, सर्व गाथा सातवाहनाने रचल्या नसून त्याने त्यांची निवड करून संग्रह केला; व हेंच सप्तशतींतील तिसऱ्या गाथेंतहि म्हटलें आहे, हें वर दाखविलें आहेच.

तेव्हा हाल सातवाहन याने गाथासप्तशती ग्रथित केली होती, असें म्हणावयास हरकत दिसत नाहीं. पुराणांत हालाचें नांव आन्ध्रराजांच्या वंशावळींत दिसतें, तेव्हा तो आन्ध्र होता असेंहि म्हणतां येतें

हाल, सातवाहन व आन्ध्र यांचें जें तादात्म्य वर दाखविलें आहे, तें पं. कृष्णशास्त्री घुले यांस मान्य नाहीं. ते म्हणतात ‘ हालाने सप्तशती केली, हें कबूल. पण तो सातवाहन राजा होता हें कशावरून ? हेमचंद्राने हालाला सालाहण म्हटलें आहे खरं, पण सातवाहणाचें सालाहण असें प्राकृत रूप होत नाहीं. शिवाय आन्ध्रराजांच्या प्राकृत लेखांतहि सातवाहन हेंच रूप आढळतें. पुराणांत आन्ध्र राजांची वंशावळ दिली आहे, तीमध्ये किंवा आन्ध्रांच्या शिलालेखांतहि या सातवाहन राजाचें नांव येत नाहीं. नाशिकच्या एका कोरीव लेखांत आन्ध्रनृपति गौतमीपुत्राला ‘ शातवाहनकुलयशःप्रतिष्ठापनकरस्य ’— सातवाहन-कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा—असें विशेषण लावलें आहे. पण पुढे त्याला ‘कुलविपुण्यश्रीकरस्य’’ ‘ कुलाची अभिवृद्धि करणारा ”[४] असें म्हटलें

---

४ याचा खरा प्राकृत पाठ ‘ कुलविपुलसिरिकरस ’ असा आहे.

आहे. यांतील पुनरुक्ति टाळावयाची असल्यास सातवाहनकुल हें गौतमीपुत्राच्या मातृकुलाचें नांव मानावें लागतें. तेव्हा हाल हा सातवाहन नव्हे. अर्थात् बाणानें प्रशंसिलेला सातवाहनाचा सुभाषित-संग्रह हाहि हालाच्या गाथासप्तशतीहून भिन्न ठरतो. या सातशे गाथांत असा एकहि शब्द नाहीं की, ज्यावरून तिचा कर्ता राजा किंवा राजसभेंतील पंडित असावा, असें निश्चयानें म्हणतां येईल. सप्तशतींतील सर्व वर्णन खेडेगावांतील दृश्यांचेंच आहे. तेव्हा सप्तशतीचा कर्ता गोदातीरचा एखादा गरीब खेडवळ ब्राह्मण असावा. शिवाय त्या ग्रंथांतील अनेक उल्लेख इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकानंतरचे दिसतात. २६१ व्या गाथेंत मंगळवाराचा उल्लेख असल्यानें,सप्तशती याज्ञवल्क्य स्मृतींनंतरची—अर्थात् खिस्तोत्तर तिसऱ्या शतकानंतरची—असावी. ४६४ व्या गाथेंत विक्रमादित्याच्या दातृत्वाचा उल्लेख आहे. तो विक्रमादित्य कालिदासाचा आश्रयदाता असावा व कालिदास इ. स. च्या सहाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला, असें डॉ. भांडारकरांनी म्हटलें आहे. ४०३ या गाथेंत गजाननानें आपल्या शुंडाग्रानें समुद्राचें सर्व पाणी शोषून घेतल्याचें वर्णन आहे. गजानन ही देवता इ. स. च्या पांचव्या शतकापासून आठव्या शतकापर्यंतच्या काळांत होऊन गेली, असें डॉ. भांडारकरांनी आपल्या 'वैष्णव, शैव व इतर धर्मपंथ' या ग्रंथांत दाखवून दिलें आहे. या सर्व प्रमाणांवरून गाथासप्तशतीचा काळ सहाव्या शतकापूर्वी जाऊं शकत नाही, हें निर्विवाद आहे.'

पं. कृष्णशास्त्री घुले यांच्या प्रमाणांचें परीक्षण श्री. अग्रबुद्ध यांनी 'वागीश्वरीं' त केलें आहे. त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. पण या प्रश्नाविषयीं प्रस्तुत लेखकाच्या अलीकडील संशोधनावरून कांहीं महत्त्वाचा पुरावा उपलब्ध झाला आहे, तो पुढे मांडतों.

पुराणांतील आंध्र नृपतींची वंशावळ व शिलालेखांतील राजनामें यांचें सादृश्य दिसत असल्यामुळे, शिलालेखांतील राजवंश हा पुराणांतील आंध्रवंश होय, असें कबूल करण्यास घुलेशास्त्री तयार आहेत. पण तो वंश सातवाहन म्हणावयास काय आधार, असें ते विचारतात. पुराणांत या राजवंशाला आन्ध्र म्हटलें आहे, त्यावरून तो मूळचा आन्ध्र देशांतील, असा अनेक हिंदी व युरोपीय संशोधकांचा ग्रह झाला आहे. पण तो बरोबर नाहीं. या राजवंशाचें खरें नांव सातवाहनच होतें व त्याचें राज्य प्रथम महाराष्ट्र, विदर्भ व कुन्तल या देशांवरच होतें, हें सप्रमाण दाखवितां येतें. या राजवंशाचे आरंभींचे कोरीव लेख मुंबई इलाख्यांत जुन्नरजवळच्या नाणेघाटांत व नाशकास अद्यापि विद्यमान आहेत. यांची आरंभींची नाणींहि विदर्भ व निजामच्या राज्याचा उत्तरभाग या प्रांतांतच सापडलीं आहेत. आन्ध्र देशांतील लेख व नाणीं पुष्कळ नंतरचीं,चोविसावा राजा वासिष्ठीपुत्र पुळुमावि याच्या व त्याच्या नंतरच्या काळाचीं मिळालीं आहेत.शिवाय या राजवंशाच्या कोणत्याहि लेखांत त्याला आन्ध्र म्हटलें नाही. उलट या वंशांतील अनुक्रमानें दुसरा राजा कृष्ण हा सातवाहन कुळांतला होता, असें नाशिकच्या कोरीव लेखांत म्हटलें आहे. तेविसावा राजा गौतमीपुत्र याला तर 'सातवाहनकुलयसपतिठापनकर (सातवाहन कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा) असें सार्थ उपपद लावलें आहे. याच राजाच्या वर्णनांत पुढे 'कुलविपुलसिरिकर' (कुलाचें ऐश्वर्य विपुल वाढविणारा) असें विशेषण आलें आहे. पण त्यांत पुनरुक्ति मुळींच नाही. कारण एकांत कुलाचें यश व दुसऱ्यांत त्याचें ऐश्वर्य वाढविल्याचा निर्देश आहे. हीं दोन्हीं विशेषणें गौतमीपुत्राच्या बाबतींत सर्वस्वी सार्थ होतीं, हें तत्कालीन इतिहासाचें परिशीलन केल्यास दिसून येईल. गौतमीपुत्राचे पूर्वज आरंभीं महाराष्ट्रांत राज्य करीत होते, हें मागे सांगितलें आहेच. कांही काळानें परकी शकक्षत्रप, भूमक व नहपान यांनी त्यांचा पराभव करून उत्तर महाराष्ट्रांत आपली सत्ता स्थापली. या दोघांचींहि नाणीं गुजराथ व उत्तर महाराष्ट्र या प्रांतांत सापडलीं आहेत. नहपानाचा जावई ऋषभदत्त याचा लेख नाशिकच्या पांडव लेण्यांत आहे. त्यावरून नहपानाच्या राज्यांत निदान कोंकण, उत्तर महाराष्ट्र व गुजराथ अन्तर्भूत होत होते, असें स्पष्ट दिसतें. त्यावेळीं सातवाहन राजे विदर्भांत येऊन राहिलेले दिसतात. पुढे गौतमीपुत्रानें नहपानाचा पराभव करून क्षहरातवंशी शकांचा समूळ निःपात केला व कोंकण, महाराष्ट्र, सुराष्ट्र (काठेवाड), माळवा,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुजराथ वगैरे प्रांत पुनः आपल्या अंमलाखाली आणले. आपल्या विजयानंतर लौकरच नाशिकच्या एका लेण्यांत कोरविलेल्या लेखांत त्याने आपला 'वेनाकटकस्वामी' असा निर्देश केला आहे, त्यावरून त्यावेळीं तो वेण्णानदीच्या (व इनगंगेच्या) परिसरांत राज्य करीत होता, हें उघड आहे. तेव्हा गौतमीपुत्राची माता बालश्री हिने आपल्या पराक्रमी पुत्राच्या निधनानंतर नाशकास कोरविलेल्या दुसऱ्या एका लेखांत 'कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा' व 'त्याचें ऐश्वर्य वाढविणारा' असें त्याचें वर्णन केलें असलें, तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति नाही, पुनरुक्ति तर नाहीच नाही.

गौतमीपुत्राला सातवाहनकुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा म्हटलें आहे. हें सातवाहन कुल त्याचें मातृकुल असावें, असें पं. बुलेशास्त्री म्हणतात. पण तें बरोबर नाही. कारण सातवाहन हें नांव गौतमीपुत्राच्या पूर्वी निदान तीन राजांच्या बाबतींत योजलेलें आढळलें. या राजवंशाचा पुराणांत उल्लेखिलेला पहिला राजा शिशुक (किंवा शिमुक) याची प्रतिमा नाणें घाटांत कोरली आहे, तिच्याखाली त्याचें नांव 'सिमुक सातवाहनो' असें कोरलें आहे. त्याच्या मुलालाहि 'कुमारो सातवाहनो' असें म्हटलें आहे. नाशिकच्या लेखांत त्याचा भाऊ कृष्ण याचें 'सातवाहकुलांत जन्मलेला' असें वर्णन आलें आहे. या सर्व ठिकाणीं सातवाहन हें त्या त्या राजाचें मातृकुल होतें, असें म्हणणें शक्य नाही, हें उघड आहे.

पण या कुळाला 'सातवाहन' तरी कां म्हणत असत, असा प्रश्न उपस्थित होतो. पुराणांतील वंशावळींत कोठेहि सातवाहन हें नांव येत नसल्याने, संस्कृत ग्रंथकारांनी व अर्वाचीन विद्वानांनी या नांवाच्या अनेक व्युत्पत्ति दिल्या आहेत. 'सात' नांवाच्या यक्षाने वाहून नेलें, म्हणून त्या राजाला 'सातवाहन' म्हणत असें कथासरित्सागरांत म्हटलें आहे. कोणी म्हणतात, सात म्हणजे अश्व त्याचें वाहन होतें, म्हणून त्याचें असें नांव पडलें. पण व्युत्पत्ति कांही असली, तरी सातवाहन या नांवाचा राजा या कुळाचा संस्थापक होता, असा निर्विवाद पुरावा आतापर्यंत मिळाला नव्हता. पुराणांत त्याचें नांव येत नाही हें मागे सांगितलें आहेच. त्याचे कोरीव लेख व नाणींहि मिळालीं नव्हतीं. तेव्हा सातवाहन नामक राजा कधी काळीं होऊन गेला, किंवा कांही अन्य कारणाने त्या कुळाला हें नांव मिळालें, हें समजण्यास साधन नव्हतें. पण सुदैवाने या वर्षीच सातवाहन राजाचीं दोन तांब्याचीं नाणीं सापडलीं आहेत. त्यांपैकीं एक औरंगाबादेस मिळालेलें माझे स्नेही डॉ. मो. गं. दीक्षित यांच्या हातीं आलें. त्याची प्लॅस्टरची प्रतिकृति त्यांनी मजकडे गेल्या जानेवारींत पाठविली होती. दुसरें नाणें वारंगळला कांही वर्षांपूर्वी सापडलें होतें. त्याचा छाप हैदराबादच्या एका गृहस्थाने मजकडे वाचनार्थ गेल्या मे महिन्यांत पाठविला होता. दोन्ही नाणीं चौकोनी प्रकारचीं असून त्यांच्या पुढील बाजूवर सोंड वर केलेला हत्ती असून त्याच्या मागील बाजूस 'रञो सिरिसादवाह–' अशीं अक्षरें आहेत. राजनामाचीं दोन अक्षरें या नाण्यांवर जागेच्या अभावीं उमटलीं नाहीत, असें दिसतें. पूर्ण नांव 'रञो सिरिसादवाहनस' (राज्ञः श्रीसातवाहनस्य) असें असावें. नाण्यांच्या मागील बाजूस उज्जैनी चिन्ह (एकावर एक आडवे उभे ठेवलेले डंबेल्स) व स्वस्तिक आहेत. अशा तऱ्हेचीं नाणीं (गौतमीपुत्र) सातकर्णी, पुळुमावि, स्कन्द सातकर्णी, यज्ञश्री सातकर्णी, विजय सातकर्णी इत्यादि पुराणांत निर्दिष्ट केलेल्या राजांचीं व इतरहि कुंभ सातकर्णीसारख्या राजांचीं आपल्या प्रांतांत अकोला जिल्ह्यांतील तऱ्हाळा गावीं पांच सहा वर्षांपूर्वी सापडलीं होतीं. त्याविषयीं माहिती प्रस्तुत लेखकाने त्यावेळीं नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्रांत प्रसिद्ध केली होती.[५] आता सापडलेल्या सातवाहन राजाच्या नाण्यांची घडण व आकार आणि त्यांवरील अक्षरें व इतर कांही चिन्हें तऱ्हाळ्याच्या नाण्यांपेक्षा फार प्राचीन दिसतात. त्यावरून सातवाहन राजा हा या कुळाचा मूळ पुरुष दिसतो. गुप्त राजापासून झालेल्या वंशाला जसें पुढे 'गुप्तवंश' असें नांव मिळालें, तसेंच सातवाहन राजापासून झालेल्या वंशाला 'सातवाहनकुल' असें नांव पडलेलें दिसतें. त्यामुळे त्या वंशांतील कोणत्याहि राजाला सातवाहन म्हणता

---

५ जिज्ञासूंस या नाण्यांवरील प्रस्तुत लेखकाचा लेख जर्नल ऑफ् दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ् इंडिया, पु. २, पृ. ८६–९४ यामध्ये सापडेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येईल. सातवाहन याचें प्राकृतांत प्रथम 'सादवाहन' व नंतर 'सालाहण' असें रूप झालेलें दिसतें.[६] तेव्हा पुराणांत निर्दिष्ट केलेल्या हाल नामक सतराव्या राजाला सातवाहन म्हणत असले, तर त्यांत आश्चर्य नाही. ४६७ व्या गाथेंत ज्या 'सालाहण' नरेन्द्राची स्तुति आली आहे, तो हालच असावा.

वरील विवेचनावरून पुराणांतील आन्ध्रवंशी हाल राजा आणि संस्कृत व प्राकृत वाङ्मयांत प्रशंसिलेला हाल हे एक होत, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. तसेंच, या हालाला सातवाहन कां म्हणत असत याचाहि उलगडा होईल. हाच हाल गाथासप्तशतीचा कर्ता होय. बाणाने प्रशंसिलेला सातवाहनाचा सुभाषितसंग्रहहि गाथासप्तशतीहून भिन्न नाहीं, हें आता सांगावयास नकोच.

पण मग गाथासप्तशतींत मंगळवारचा अनिष्टवार म्हणून उल्लेख, राधाकृष्णांच्या लीला, गजाननाचें वर्णन इत्यादि सकृद्दर्शनीं उत्तरकालीन दिसणारे उल्लेख कसे आले, अशी शंका उत्पन्न होते. किंबहुना, अशा उल्लेखांमुळेच पं. कृष्णशास्त्र्यां-सारख्या विद्वान् संशोधकांना हाल–सातवाहन राजाने गाथासप्तशती रचिली, या परंपरागत समजुतीच्या खरेपणाविषयीं शंका आली. हे सर्व उल्लेख खिस्ती शकाच्या पहिल्या–दुसऱ्या शतकानंतरचे असलेच पाहिजेत असा प्रस्तुत लेखकाचा आग्रह नाही. यांतील प्रत्येक बाबीचा चिकित्सक दृष्टीने विचार करून निश्चय केला पाहिजे. पण हे उल्लेख पहिल्या-दुसऱ्या शतकानंतर प्रचलित झालेल्या देवतादिकांचे आहेत, असें मानलें, तरी त्यांची समाधानकारक रीतीने उपपत्ति लावतां येते, हें प्रस्तुत लेखांत दाखवावयाचें आहे.

गाथासप्तशती हा प्राकृत गाथांचा संग्रह आहे, हें मागे सांगितलेंच आहे. यांत अनेक कवींच्या गाथा आहेत. आरंभीं प्रत्येक गाथेशीं तिच्या कर्त्याचें नांव संलग्न असावें, पण पुढे, संस्कृत सुभाषितांच्या बाबतींत झालें त्याप्रमाणे, कित्येक कवींचीं नांवें विस्मरणा-मुळे किंवा लेखकांच्या निष्काळजीपणामुळे गळलेलीं दिसतात. तथापि सप्तशतीच्या अवशिष्ट टीकांत अनेक कवींचीं नांवें दिलीं आहेत. सध्या तेरा टीका अवशिष्ट आहेत. त्यांपैकी फक्त गंगाधर भट्टाची टीका निर्णयसागर छापखान्याने छापलेली दोन वर्षांपूर्वी-पर्यंत उपलब्ध होती. निर्णयसागरी आवृत्तींत गंगाधर भट्टाच्या टीकेंत कवींचीं नांवें आढळत नाहीत; पण त्या आवृत्तीला जोडलेल्या गाथासूचींत कित्येक कवींचीं नांवें विशिष्ट गाथांशीं संबद्ध अशीं दिलीं आहेत. हीं नांवें ' रइराअस, ' ' गुणड्ढस्स, ' ' मिअङ्कस्स ' अशीं प्राकृत भाषेंत षष्ठ्यन्त आहेत. दोन वर्षांपूर्वी पीताम्बर नामक टीकाकाराची ' गाथा-सप्तशती-प्रकाशिका ' नांवाची संस्कृत टीका पंजाबचे पं. जगदीशलाल शास्त्री यांनी प्रकाशित केली. ही टीका सप्तशतीच्या ३८८ ते ७०० या गाथांवरच उपलब्ध झाली आहे. या टीकेंत कित्येक अज्ञात अशीं कवि-नामें दिसतात. तीं सर्व संस्कृतांत दिलीं आहेत. इतर टीका प्रकाशित झाल्या, तर आणखीहि कांही कवींचीं नांवें प्रकाशांत येतील. तथापि सध्या उपलब्ध असलेल्या नावांवरूनहि महत्त्वाचीं अनुमानें काढतां येतात.

सप्तशतींतील गाथा महाराष्ट्री प्राकृतांत लिहिल्या आहेत, त्यांत गोदावरी नदीचा उल्लेख अनेक ठिकाणीं व विंध्य पर्वताचा कांही ठिकाणीं येतो उत्तरेंतल्या एकाहि नदीपर्वताचा त्यांत निर्देश नाही. तेव्हा या गाथा महाराष्ट्रांत (यांत प्राचीन महाराष्ट्र, विदर्भ व गोदावरीच्या दक्षिणेचा कुन्तल यांचा अन्तर्भाव होतो)–विशेषतः गोदावरीच्या परिसरांत रचल्या गेल्या, यांत संशय नाही. सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) हीहि गोदावरीच्या काठींच होती. सातवाहन वंशांतील इतर राजांप्रमाणे हाल राजाहि गोदावरी तीरीं राज्य करीत होता, हें मागे उद्धृत केलेल्या गाथेवरून दिसून येईल.

सप्तशतींतील कांही गाथा हालाने रचिल्या होत्या. कांही त्याच्या दरबारच्या कवींनी रचल्या असाव्या. या कवींमध्ये पालित, पालित्त किंवा पादलिप्त हा कवि प्रमुख होता, असें दिसतें. पण कित्येक गाथा राजदरबाराशीं संलग्न नसलेल्या प्राकृत कवींनी रचिलेल्या दिसतात. त्यांत कांही रेवा, रोहा, अनुलक्ष्मी यांसारख्या कवयित्रीहि

---

६ प्राकृतांत मूळच्या द चा ल होतो, हें गोदा-नदी या ' गोला ' ह्या सप्तशतींतच आलेल्या नांवावरून स्पष्ट होईल.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होत्या. इसवी सनाच्या पहिल्या चार-पांच शतकांत महाराष्ट्रांत प्राकृत काव्यगंगेला पूर आलेला दिसतो. राजापासून रंकापर्यंत ज्याला म्हणून नैसर्गिक काव्यप्रतिभा होती, त्याने प्राकृत गाथा रचलेल्या दिसतात. आणि म्हणूनच या गाथांमध्ये संस्कृत काव्यांत सहसा न आढळणारें खेडेगावांतील जीवन चित्रित केलेलें दिसतें. अशा कोट्यवधि गाथांमधून हालाने सातशे गाथांची निवड केली, असें एका गाथेंत म्हटलेलें आपण पाहिलें आहेच. गाथा-सप्तशतीच्या विविध पाठांतून आलेल्या भिन्न भिन्न गाथा व संस्कृत आलंकारिकांनी उद्धृत केलेल्या तदितर अनेक गाथा यांची एकंदर संख्या लक्ष्यांत घेतली, तर या विधानांत फारशी अतिशयोक्ति असेल, असें वाटत नाही. या गाथांच्या लोकप्रियतेचा पुरावा सप्तशतींत अनेक ठिकाणीं आढळतो. अमृततुल्य प्राकृत काव्य वाचावें किंवा ऐकावें कसें, हें ज्यांना कळत नाही, पण जें कामपुरुषार्थाच्या तत्त्वज्ञानाची उठाठेव करतात, त्यांना लाज कशी वाटत नाही, असें एक कवि विचारतो[७]! ललित, मधुर शब्दांचें शृङ्गाररसमय असें तरुणींना आवडणारें प्राकृत काव्य असल्यावर संस्कृताला कोण विचारतो, असें दुसरा कवि म्हणतो![८] त्या काळीं महाराष्ट्री प्राकृतांत इतकी काव्य-रचना झाली व तिची सर्व देशभर इतकी प्रशंसा झाली कीं, त्यापुढे प्राकृत काव्य लिहावयाचें झालें, तर तें महाराष्ट्रींत लिहिलें पाहिजे, असा संकेत ठरून गेला आणि तो संकेत सर्व उत्तरकालीन संस्कृत नाटककारांनी आपल्या पात्रांच्या तोंडीं प्राकृत पद्यें घालतांना तंतोतंत पाळलेला दिसतो.

पण सप्तशतींतल्या सर्वच गाथा हालाच्या काळीं, किंवा तत्पूर्वी रचिल्या, असें म्हणता येत नाही, हें गाथा-सूचींतील कविनामांचें निरीक्षण केल्यास स्पष्ट होईल. या गाथांमध्ये प्रवरसेनाच्या नांवावर पांच गाथा [६४,२०२,२०८,४८१ आणि ५६५] गंगाधर भट्ट व पीतांबर यांनी दिल्या आहेत. हा प्राकृत कवि वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनच असावा; कारण या वाकाटक राजाने महाराष्ट्रींत सेतुबंध किंवा रावणवहो [रावणवध] हें काव्य रचलें होतें. त्याची बाण, दण्डी, आनन्दवर्धन इत्यादि संस्कृतकवींनी व आलंकारिकांनी मुक्तकंठाने स्तुति केली आहे. हा प्रवरसेन सुप्रसिद्ध गुप्त सम्राट द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य याचा दौहित्र असून, तो प्रथम रामटेकजवळ नन्दिवर्धन येथून व नंतर प्रवरपुराहून उत्तरविदर्भावर राज्य करीत होता. याचा काळ सुमारें इ. स. ४२० ते इ. स. ४५० हा असावा.

पीतांबराच्या ‘गाथासप्तशतीप्रकाशिका’ टीकेंत सर्वसेन नामक दुसऱ्या एका कवीचें नांव ५०४ व ५०५ या गाथांचा कर्ता म्हणून आलें आहे. भुवनपाल नामक दुसऱ्या एका टीकाकाराने २१७ व २३४ या गाथांचाहि तोच कर्ता होता, असें म्हटलें आहे. हा सर्वसेनहि वाकाटक नृपति असावा. कारण पांच-सहा वर्षांपूर्वी वाशीमला सापडलेल्या ताम्रपटांत सर्वसेनाचें नांव वाकाटक सम्राट् पहिला प्रवरसेन याचा मुलगा व उत्तराधिकारी म्हणून आलें आहे.[९] पहिल्या प्रवरसेनाला चार मुलगे होते व ते चारहि राजे झाले, असें पुराणांत म्हटलें आहे. त्यावरून प्रवरसेनाचें विस्तृत साम्राज्य त्याच्या चार मुलांमध्ये विभागलें होतें असें दिसतें. त्यांपैकी ज्येष्ठ पातीच्या अंमलाखाली उत्तर विदर्भ होता, हें माग सांगितलें आहेच. दुसऱ्या शाखेचें राज्य दक्षिण विदर्भावर होतें व तिची राजधानी वत्सगुल्म (सध्याचें वाशीम) ही होती. तिचा संस्थापक सर्वसेन हा स्वतः उत्कृष्ट प्राकृत कवि होता. हा इ. स. ३३०-३५५ या काळांत होऊन गेला. त्याने महाराष्ट्रींत रचिलेलें ‘हरिविजय’ नामक काव्य सध्या उपलब्ध नाही. तथापि, दण्डी, आनन्दवर्धन, कुन्तक, हेमचन्द्र इत्यादि आलंकारिकांनी कालिदासाच्या काव्याच्या बरोबरीने

---

७ अमिअं पाउअकव्वं पढिउं सोउं अ जे ण आणन्ति।
कामस्स तत्ततन्तिं कुणन्ति ते कथं न लज्जन्ति ॥

८ ललिए महुरक्खरए जुवइयणवल्लहे ससिङ्गारे।
सन्ते पाइयकव्वे को सक्कइ सक्कयं पढिउं ॥
वज्जालग्गम, गाथा २९.

९ एपिग्राफिआ इंडिका पु. २६, १३७-१५५ पहा; सर्वसेनाचे नाव अजंटा येथील सोळा नं. च्या लेण्यांतील कोरीव लेखांत आलेलें प्रस्तुत लेखकाने याच लेखांत दाखविलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या काव्याची स्तुति केलेली आढळते. सर्वसेन व त्याच्यानंतरचे वाकाटक नृपति यांच्या आश्रयाखाली प्राकृत काव्याचा वत्सगुल्म नगरींत अत्यंत उत्कर्ष झालेला दिसतो. कारण तत्कालीन प्राकृत काव्यांमुळे संस्कृतांतल्या वैदर्भीप्रमाणे प्राकृतांची वच्छोमी (वात्सगुल्मी) ही रीतीहि सर्वत्र प्रसिद्धी पावली. वत्सगुल्म नगर बराच काळ काव्य व कला यांचें माहेरघर होऊन राहिलें होतें. इ. स. च्या दहाव्या शतकांत होऊन गेलेल्या राजशेखर कवीनें आपल्या काव्यमीमांसेंत वत्सगुल्म नगरींत काव्यपुरुषाचा साहित्यविद्यावधूशीं विवाह झाला, असें वर्णिलें आहे, त्यावरूनहि त्या शहराचें प्राचीन वैभव व्यक्त होतें.

द्वितीय प्रवरसेन व सर्वसेन यांचीं राज्यें गोदावरीच्या उत्तरेस होतीं. पण दुसऱ्या दोन वाकाटक शाखांचा अंमल गोदावरीच्या दक्षिणेस असावा. या शाखांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत म्हणून त्यांमध्ये कोण राजे होऊन गेले, तें निश्चितपणें सांगतां येत नाही. नन्दिवर्धन व वत्सगुल्म येथे राज्य करणाऱ्या सर्व नृपतींचीं नांवें सेनपदान्त आहेत. उदाहरणार्थ प्रवरसेन, रुद्रसेन, पृथिवीषेण, नरेन्द्रसेन, देवसेन, हरिषेण इत्यादि. यांसारखीं कांही नांवें-जयसेन, मकरन्दसेन, सत्यसेन, मल्लसेन इत्यादि सप्तशतीच्या कवि-सूचींत आढळतात. हीं नांवें राहिलेल्या दोन वाकाटक शाखांच्या राजांचीं किंवा राजकुमारांचीं असावीं, असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही.

पण या दोन शाखा लौकरच नामशेष झालेल्या दिसतात व याचें कारण गोदावरीच्या दक्षिणेस कुन्तल देशांत राष्ट्रकूट राजांचा इ. स. ३७५ च्या सुमारास उदय झाला, हें होय. हें राष्ट्रकूट घराणें सातारा जिल्ह्यांत माण येथे राज्य करीत होतें, हें प्रस्तुत लेखकानें, 'सह्याद्री' तील (वर्ष ११ अं. ७, पृ. ४४८) लेखांत दाखविलें आहे. या वंशांतील देवराज हा राजा विलासलोलुप व कलाभिज्ञ होता, असें कालिदासाच्या 'कुन्तलेश्वरदौत्य'वरून दिसतें. सप्तशतीच्या कविसूचींत देवराजाच्या नांवावर २३८ व २३९ या दोन गाथा दिल्या आहेत. हा देवराज राष्ट्रकूटवंशी होता, असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाही. तो द्वितीय प्रवरसेनाचा समकालीन असून इ. स. च्या पांचव्या शतकाच्या आरंभीं राज्य करीत असावा. प्रवरसेन व सर्वसेन यांच्याप्रमाणे देवराजानें एखादें स्वतंत्र प्राकृत काव्य रचलें होतें काय, हें माहीत नाही. तथापि त्यानें प्राकृत भाषेचा कोश रचला होता, अशी माहिती हेमचन्द्राच्या देशीनाममालेवरून समजते. तेव्हा त्यानें प्राकृत गाथा रचल्या असल्या, तर त्यांत आश्चर्य नाही.

वाकाटक नृपति सर्वसेन व द्वितीय प्रवरसेन आणि राष्ट्रकूट नृपति देवराज यांच्या गाथा अर्थात्च हालानंतर कित्येक शतकांनी सप्तशतींत घातल्या गेल्या असाव्या. कारण सर्वसेन हा इ. स. च्या चौथ्या शतकांत आणि प्रवरसेन व देवराज हे पांचव्या शतकांत होऊन गेले. तथापि सप्तशतीला हल्लीचें रूप पांचव्या शतकांतहि पूर्णपणें आलें होतें, असें दिसत नाही. कारण तिच्यांतील कांही गाथा वाक्पति राजानें (बप्पइराआने) रचल्या होत्या असें दिसतें. गंगाधराच्या टीकेंत बप्पइराआच्या नांवावर एकच-९५ वी-गाथा दिलेली दिसते. पण पीताम्बरानें वाक्पति राजाचें नांव आणखी तीन (नं. ६१६, ६१७ व ६१८). गाथांवरच्या टीकेंत दिलें आहे. हा वाक्पतिराजहि देवराज, सर्वसेन व प्रवरसेन यांच्याप्रमाणेच प्राकृतवाङ्मयांत उत्कृष्ट ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध आहे. यानें महाराष्ट्र भाषेंत 'मधुमथनविजय' व 'गौडवध' अशीं दोन काव्यें रचलीं होतीं. त्यांपैकी पहिलें सध्या उपलब्ध नाही. पण सुप्रसिद्ध आलंकारिक आनन्दवर्धन यानें आपल्या ध्वन्यालोकांत त्याची प्रशंसा केली आहे आणि भोज व अभिनवगुप्त यांनी त्यांतील कांही प्राकृत गाथा उद्धृत केल्या आहेत, त्यावरून त्यांत कृष्णचरित्र वर्णिलें होतें, असें दिसतें. गौडवध काव्यांत कनोजचा सम्राट यशोवर्मा याचा दिग्विजय वर्णिला आहे. वाक्पतिराज हा भवभूतीचा समकालीन असून, भवभूतीप्रमाणे त्यालाहि यशोवर्म्याचा आश्रय होता, असें कल्हणाच्या राजतरंगिणीवरून समजतें. वाक्पतिराजानेंहि आपल्या काव्यांत 'भवभूति हा अमृताचा सागर असून, त्याचे कांही बिन्दु मात्र माझ्या कथावर्णनांत स्फुरतात' असें अत्यंत विनयानें भवभूतीचें ऋण व्यक्त केलें आहे. 'भवभूति

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपले पूर्वज विदर्भांत पद्मपुर नामक नगरीं राहत असत, असें आपल्या नाटकांत सांगतो. हें पद्मपुर भंडारा जिल्ह्यांतील आमगावाजवळचें पदमपुर होय हें प्रस्तुत लेखकानें इतरत्र दाखविलें आहे.[१०] तेव्हां भवभूतीप्रमाणें वाक्पतिराज हाहि वैदर्भ कवि असावा, असें सहजच अनुमान सुचतें. हे दोन्ही कवि इ. स. च्या आठव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेले. त्या काळीं विदर्भांत त्यांस राजाश्रय न मिळाल्यानें उत्तरेंत कनोजनृपतीच्या आश्रयास जावें लागलें, असें दिसतें. सप्तशतींत घेतलेल्या वाक्पतिराजाच्या उपरिनिर्दिष्ट गाथा ' गौडवध ' काव्यांत आढळत नाहींत. तेव्हां त्या त्याच्या ' मधुमथन ' काव्यांतील असाव्या, असें अनुमान कांहीं विद्वानांनीं केलें आहे. पण त्या गाथांच्या अर्थाकडे लक्ष्य देतां, त्या इतर गाथांप्रमाणेच ' मुक्तक ' रूपाच्या दिसतात. तेव्हां त्या वाक्पतिराजानें प्रसंगोपात्त रचल्या असाव्या.

वरील विवेचनावरून गाथासप्तशतींत निदान आठव्या शतकापर्यंत वेळोवेळीं भर पडत गेली असावी, हें वाचकाच्या लक्ष्यांत येईल. या गाथांमध्यें कोणत्याहि कथानकाचा संबंध येत नसल्यानें, एकादी गाथा गाळणें किंवा नवीन घालणें मुळींच कठीण जात नसे; व याच कारणामुळे सप्तशतींतील गाथांच्या अनुक्रमांत व पाठांत अत्यंत वैविध्य दृष्टीस पडतें. सप्तशतीच्या हस्तलिखितांचा अभ्यास करून वेबर साहेबानें तिच्या निदान सहा आवृत्त्या झाल्या असाव्या असें सप्रमाण दाखविलें आहे. त्या सर्वांमध्यें फक्त ४३० गाथा समान आहेत. बाकीच्या कांहीं विशिष्ट पाठांतच आढळतात. त्यावरूनहि सप्तशतीच्या आवृत्त्या भिन्न भिन्न काळांत होत गेल्या, हें उघड आहे.

सप्तशतींतील गाथांची ही वस्तुस्थिति असल्यानें, ' तो गाथासंग्रह इ. स. च्या दुसऱ्या शतकांत रचला गेला ' या विधानाप्रमाणेच ' सप्तशती इ. स. च्या सहाव्या शतकामागें जाऊं शकत नाहीं ' हें विधानहि लटकें पडतें. सप्तशतींतील कांहीं गाथा हालाच्याहि पूर्वींच्या असतील,[११] तर कांहीं हालानंतर शेंकडों वर्षांनीं रचलेल्या दिसतात. तेव्हां सप्तशतींतील गाथांचा पुरावा इतर ग्रंथांच्या किंवा प्रसंगांच्या कालनिर्णयार्थ ग्राह्य धरण्यापूर्वीं त्या गाथा विशिष्ट कालांत रचल्या गेल्या, हें ठरविणें जरूर आहे. पण तसें करणें सध्या दुरापास्त असल्यानें अशा पुराव्यावर भिस्त न ठेवणें बरें !

उदाहरणार्थ आपण खालील गाथा घेऊं—

संवाहणसुहरसतोसिएण देन्तेण तुह करे लक्खम् ।
चलणेण विक्कमाइत्तचरिअं अणुसिक्खिअं तिस्सा ॥

गाथा नं. ४६४

भावार्थ—एक स्त्री आपल्या प्रियकरास म्हणते–तूं तिचे पाय चुरीत होतास, त्यावेळीं त्या आनंदांत तुझ्या हातावर लाक्षारसानें काढलेल्या आकृति उमटविण्यांत तिच्या पायानें विक्रमादित्याच्या कृत्यांचें अनुकरण केलें आहे. कारण विक्रमादित्य राजा आपल्या सेवकांच्या कामगिरीनें संतुष्ट होऊन त्यांच्या हातावर लक्ष नाणीं ठेवत असतो. (यांत ' लक्खम् ' या पदावर श्लेष असल्यानें त्याचे लाक्षा व लक्ष (नाणीं) असे दोन अर्थ होतात.)

या गाथेंत विक्रमादित्याच्या दानशूरत्वाचें वर्णन आहे. ' ही गाथा सप्तशतींत आली असल्यामुळे, हा विक्रमादित्य इ. स. च्या पहिल्या–दुसऱ्या शतकापूर्वी होऊन गेला असावा, अर्थात् तो ख्रिस्तपूर्व ५८ व्या वर्षी सुरू झालेल्या संवत्सराचा संस्थापक असला पाहिजे. तेव्हां या गाथेवरून विक्रमादित्य व त्याचा आश्रित कालिदास हे ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेले, हें मत सिद्ध होतें ' असें कांहीं विद्वानांनीं प्रतिपादिलें आहे. याच्या उलट पं. कृष्णशास्त्री घुले म्हणतात कीं, या गाथेमुळे सप्तशतीच इ. स. च्या सहाव्या शतकामागें जाऊं शकत नाहीं. कारण डॉ. सर

---

१० सह्याद्रि, वर्ष १, अंक ५, पृ. ३७७–३८६ पाहा.

११ गंगाधरभट्टानें माधवसेन नामक कवीच्या नांवावर ३२७ वी गाथा दिली आहे. कालिदासाच्या मालविकाग्निमित्रावरून शुंगकाळीं म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत विदर्भाचें राज्य माधवसेन व यज्ञसेन या दोन चुलत भावांत विभागलें होतें असें दिसतें. कदाचित् हा माधवसेनच ३२७ व्या गाथेचा कर्ता असेल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रामकृष्णपंत भांडारकरांनी कालिदासादि नवरत्नें सहाव्या शतकाच्या प्रथमार्धांत होऊन गेलीं, या डॉ. कर्नच्या मताचा पुरस्कार आपल्या ' दक्षिणच्या प्राचीन इतिहासा'त केला आहे. श्री. अग्रबुद्धांस तर या गाथेंतील वर्णन विक्रमादित्याबद्दल आहे काय, याबद्दल शंका वाटते. कारण ते म्हणतात ' एका श्लोकाला एक लाख रुपये असल्या आख्यायिका विक्रमाविषयीं नसून भोजराजाविषयीं आहेत.'[१२]

या मतामताच्या गलबल्यांत तथ्य काय आहे तें पाहूं. सप्तशतीच्या अनेक आवृत्त्या झाल्या असल्यामुळे, जोंपर्यंत ही गाथा हालराजाच्या मूळच्या सप्तशतींत होती, असें निर्विवादपणें सिद्ध करतां येत नाही, तोंपर्यंत केवळ तिच्या पुराव्यावरून विक्रमादित्य ख्रिस्तोत्तर पहिल्या–दुसऱ्या शतकापूर्वी होऊन गेला, असें अनुमान करणें योग्य होणार नाही. शिवाय शिलालेखादिकांच्या पुराव्यावरून सध्या विक्रमादित्याच्या नांवाने प्रचलित असलेल्या संवत्सरास पूर्वी ' कृतसंवत् ' असें नांव होतें, हें सिद्ध झालें आहे.[१३] तेव्हा ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत विक्रमादित्य होऊन गेला, याविषयीं निश्चित पुरावा मिळत नाही. प्रस्तुत गाथेंतलें वर्णन आकराव्या शतकांतल्या भोजराजाच्या अगोदर कोणत्याहि राजास लागू पडत नाही, असें म्हणणेंहि धाष्टर्याचें होईल. कारण गुप्तवंशी विख्यात सम्राट द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य याचीहि दानशूरत्वाबद्दल ख्याति होती. त्याने केवळ लक्षावधिच नव्हे, तर कोट्यवधि नाणीं दान केल्याच्या कथा लोकांत प्रचलित होत्या, हें खालील श्लोकावरून दिसून येईल. हा श्लोक संजान येथील ताम्रपटांत राष्ट्रकूट सम्राट पहिला अमोघवर्ष याच्याविषयीं आला आहे.[१४]

हत्वा भ्रातरमेव राज्यमहरद्देवीं च दीनस्तथा
लक्षं कोटिमलेखयत्किल कलौ दाता स गुप्तान्वयः।
येनात्याजि तनुः स्वराज्यमसकृद्बाह्यार्थकैः का कथा
ह्रीस्तस्योन्नतराष्ट्रकूटतिलको दातेति कीर्त्यामपि॥

[अर्थ—गुप्तवंशी (द्वितीय चन्द्रगुप्त) आपल्या भावालाच ठार मारून त्याची पत्नी व राज्य हरण करता झाला.[१५] (तेव्हा) तो तिरस्करणीय होय. तथापि तो लाख, कोटी अशीं नाणीं दान केल्याबद्दल (आपल्या कोशाध्यक्षाला) लिहावयास लावीत असे,[१६] म्हणून त्याला या कलियुगांत दाता म्हणतात ! तेव्हा ज्याने स्वतःचा देह व आपलें राज्य अनेकदा दान केलें[१७] (बाह्य वस्तूंची गोष्ट तर सांगावयासच नको.) त्या थोर राष्ट्रकूटवंशाचा तिलकभूत अशा (अमोघवर्ष) राजाला आपली दाता म्हणून कीर्ति झाली असतां लज्जा वाटते !]

या श्लोकावरून द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्यासंबंधीं लक्षदानाच्या आख्यायिका लोकांत प्रचलित होत्या, यांत संशय नाही. तेव्हा या विक्रमादित्याचा उल्लेख सप्तशतीच्या उपरिनिर्दिष्ट गाथेंत आहे, असें मानलें तर खचित चूक होणार नाही. ' सप्तशतीं ' त वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन व राष्ट्रकूट नृपति देवराज यांच्या गाथा आल्या आहेत, हें आपण पाहिलें आहेच. द्वितीय चन्द्रगुप्त हा त्यांचाच समकालीन असल्यामुळे व तत्कालीं वाकाटक व राष्ट्रकूट या दोन्ही राजवंशांस ह्याचा आश्रय असल्यामुळे[१८] त्याच्यासंबंधीं अशा गाथा विदर्भांत

---

१२ वाग्गीश्वरी, पु. ३, पृ. ९

१३ डॉ. अ. स. अळतेकर यांचा विक्रमसंवत्सरावरील लेख पाहा. सह्याद्रि पु. ९, पृ. ६९३–७०१.

१४ एपिग्राफिआ इंडिका, पु. १८, पृ. २४८.

१५ या प्रसंगाची माहिती प्रस्तुत लेखकाच्या ' कालिदास ' पुस्तकांत (पृ. ५१–५२) मिळेल.

१६ विक्रमादित्याच्या संबंधींच्या अशा आख्यायिका मज्मुलतवारिखमध्ये दिल्या आहेत.

१७ अमोघवर्षाने एका प्रसंगीं लोकोपद्रव (रोगाची साथ) शमविण्याकरिता आपल्या डाव्या हाताची अंगुलि महालक्ष्मीला अर्पण केली होती व अनेकदा धर्माचरणार्थ राज्यत्याग केला होता, त्याला अनुलक्षून हें विधान आहे.

१८ द्वितीय प्रवरसेनाचा वडील भाऊ दिवाकरसेन हा गादीवर आला तेव्हा अल्पवयस्क असल्याने वाकाटकांचा राज्यकारभार गुप्त अधिकाऱ्यांकरवीं चालला होता. राष्ट्रकूटांच्या राज्यकारभाराची जोखीम चन्द्रगुप्ताने आपल्या शिरावर घेतली होती असें कालिदासाच्या कुन्तलेश्वरदौत्यांत म्हटलें आहे. (सह्याद्रि, पु. ११, पृ. ४५२–५४ पाहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रचल्या गेल्या, तर त्यांत मुळींच आश्चर्य नाही. सारांश, या गाथेमुळे विक्रमादित्य व म्हणून त्याचा आश्रित कविकुलगुरु कालिदास हे इ. स. ४०० च्या सुमारास होऊन गेले, या मताला पुष्टिच मिळते.

इतर वादग्रस्त प्रश्नांबद्दल अशीच गाथांच्या पुराव्याची छाननी झाली पाहिजे. त्या सर्वांचा येथे विचार करणें शक्य नाही. तथापि जातां जातां हें सांगावेंसें वाटतें की, गजाननवर्णनपर ४०३ नंबरची गाथा ही पीतांबराच्या टीकेंत येण्यासारखी असूनहि आली नाही, तेव्हा ती हालनृपतीच्या मूळच्या गाथासंग्रहांत होती काय, याविषयीं शंका वाटते.

वृत्ति, कृति आणि अनुभूति

प्रा० श्री. ना. बनहट्टी

प्रा. बनहट्टी यांच्यासारख्या प्रसिद्धिपराङ्मुख व अबोल साहित्यिकाच्या अंतःकरणांत डोकावून पाहण्याची दुर्मिळ संधी त्यांच्या या आत्मवृत्तपर लेखामुळे वाचकांस प्राप्त होत आहे. बनहट्टींनी वाङ्मयसेवेप्रमाणेच संस्थासंचालनहि अविरत करीत राहावें असें हा लेख वाचणारा प्रत्येक वाचक म्हणेल !

माझे मित्र आणि ' युगवाणी ' मासिकाचे सन्माननीय संपादक रा. वामनराव देशपांडे यांनी ' युगवाणी ' करिता मीं माझ्या स्वतःच्या लेखनासंबंधाने आत्मचरित्रवजा कांही तरी लिहावें, अशी आज्ञा करून मला मोठ्या संकटांत घातलें आहे. वामनरावांनी आजपर्यंत मजकरिता पुष्कळ सोसलें आहे. तेव्हा त्यांनी घातलेलें संकट हें एक धर्मसंकट मानून तें सहन करावें, याखेरीज मला गत्यंतर दिसत नाही.

माझें चरित्र अल्प आहे व लेखन त्याहूनहि अल्प आहे. तेव्हा त्याविषयीं लिहावें काय, असा प्रश्न मनांत येऊन मन बुचकळ्यांत पडतें. त्यांतून मी कांही विशेष लोकप्रिय लेखकांत मोडत नाहीं; अर्थात् माझ्यासंबंधाने वामनरावांसारख्या मित्रांना जें वाटत असेल तें सोडलें, तर सामान्य वाचकवर्गाला कांही कुतूहल वाटत असेल असें मुळींच मानतां येत नाही. तेव्हा मित्राची आज्ञा, प्रसंगाचें औचित्य आणि सामान्य वाचकवर्गाची अपेक्षा या तीन्ही गोष्टींचा समन्वय साधण्याचें बिकट काम मला येथे करावयाचें आहे, असें समजून चाललें पाहिजे.

स्वतःविषयीं लिहिण्याचा प्रसंगच आला आहे, तेव्हा माझ्यासंबंधीं पुष्कळांच्या होत असलेल्या एका गैरसमजाचें प्रथमारंभीच निराकरण करतों. बरीच मंडळी माझी मातृभाषा कानडी आहे असें समजतात; कांहींना असें वाटतें की, मराठीच्या सरावामुळे कानडीचा संस्कार लुप्तप्राय झालेला असला, तरी मला थोडेंबहुत कानडी समजत असेल व चार शब्द बोलतांहि येत असतील. माझ्या 'बनहट्टी' या आडनांवावरून हा समज निर्माण झाला असावा, हें उघड आहे.

गोष्ट एकच असली तरी मनुष्य आपापल्या भावनेनुसार तिला निरनिराळीं रूपें देतो. परवा दर्यापुरास संमेलनप्रसंगीं अध्यक्षाची ओळख करून देणाऱ्या कांही व्यक्तींनी वरील गोष्टीचा उल्लेख गौरव करण्याच्या हेतूने केला. "मूळची भाषा कानडी असूनहि यांनी मराठी भाषेचे अध्यापक होण्याइतकें तिजमध्ये प्राविण्य मिळविलें आहे " इ. इ. वर्णन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण्यांत आलें. कांही कानडी वृत्तपत्रांमधूनहि " बनहट्टी हे मूळचे कानडी असून त्यांनी मराठींत लेखन केलें आहे " ही गोष्ट भूषणास्पद म्हणून वर्णन करण्यांत येत असतें, असें मीं ऐकलें आहे. केव्हा केव्हा याच वस्तुस्थितीचा याच्या उलटहि उपयोग केला जातो. " हा मूळचा कानडी मनुष्य कितीहि शिकून मराठीचा पढीक पंडित झाला तरी त्याची लायकी तितपतच ! मराठीचें हार्द व मर्म त्याला थोडेंच अवगत होणार आहे ! " असें सांगून अथवा सुचवून त्यायोगें जें साध्य होण्याजोगें असेल तें साधणारे कांही लोक नसतात, असें नाही. खरी गोष्ट माहीत असूनहि कांही मतलबाकरिता असें भासविण्याचा डाव कित्येक ठिकाणीं खेळला जात असेल असाहि संभव आहे.

दोरीवर सापाचा भास होणें हेंच जर मुळांत मिथ्यातर त्या भासामुळे उत्पन्न होणारे रागद्वेष, भयक्रोध हे सुतराम मिथ्या हें सांगावयास नको. कानडी मला येत नाही, बोललेलेंहि समजत नाही. कानडी माझी मातृभाषा आहे, किंवा मला कानडी समजतें ही समजूत पूर्णपणें खोटी आहे. आमचें घराणें मूळचें कर्नाटकांतील खरें, परंतु महाराष्ट्रांत आल्यानंतर १००।१२५ वर्षांपूर्वीच त्यांची कानडी भाषा सुटली व मराठीचा तिच्या जागीं प्रवेश झाला. माझी आई निवळ मराठी होती. मराठीचें महाकेंद्र संतांचें माहेरघर जें पंढरपूर तेंच तिचें माहेर होतें. मी अगदी लहान असतां ती जेव्हा पंढरपुरास विठोबासमोर जाऊन ध्यानस्थ बसे, तेव्हा मी तिच्याभोवती घोटाळत असतां तेथील भजनांतून चाललेला मराठी संतांच्या वाणीचा गजर माझ्या-कानांनी मनमुराद पिऊन घेतलेला आहे. विठोबाच्या-पुढे भक्त मंडळांचीं मराठी भजनें चालावयाचीं, तर रखमाईसमोर नेहमी वेदघोष चालावयाचा. दोहोंनी माझे कान परिपूरित झाले व मनावर त्या अजाणत्या अवस्थेंतहि, कांही संस्कार झाला. तेव्हा ' मातृ-भाषा ' या शब्दाचा योगिक, रूढ अगर लौकिक कोणताहि अर्थ घेतला, तरी मराठीखेरीज दुसरी कोणतीहि माझी मातृभाषा ठरूं शकत नाही. बाल्या-पासूनचें माझें सर्व आयुष्य मराठी मुलखांत पुण्यास किंवा पुण्याच्या उत्तरेस गेल्यामुळे माझी बोधभाषाहि मराठीच ठरली.

भाषा ही आनुवंशिक आहे की संस्कारसिद्ध आहे, असा एक वाद पूर्वी भाषाशास्त्रज्ञांमध्ये प्रचलित असे. भाषा आनुवंशिक अथवा जन्मतः प्राप्त आहे, असें म्हणणाऱ्यांचा आशय असा की, बालकाच्या मुखांतील शब्दोच्चाराच्या कामीं पडणारे अवयव आणि त्यांच्याशीं संबंध असलेले ज्ञानतंतु, जी भाषा बोलणाऱ्या घराण्यांत किंवा मानव-जातींत तें बालक जन्मास आलेलें असेल, त्या भाषेच्या ग्रहणास अनुकूल असे जन्मतःच विशिष्ट प्रकारचे बनलेले असतात; अर्थात् स्ववंशप्राप्त भाषा आत्मसात् करणें हें इतर भाषा शिकण्यापेक्षा त्या बालकाला किती तरी सुलभ जातें. याच्या उलट संस्कारवाद्यांचें म्हणणें असें की, मनुष्य-व्यक्तीमध्ये जन्मतःच भाषाविषयक वैशिष्ट्य असें कांही नसतें. भाषा ही सर्वस्वी जन्मानंतर होणाऱ्या संस्कारांनी व्यक्तींच्या ठायीं बिंबते. या वादाचा निकाल अनुभवा अंतीं व निरीक्षणा अंतीं संस्कार-वाद्यांच्या तर्फे लागला. आमच्यासारखीं एक भाषा सोडून दुसऱ्या भाषेंत प्रविष्ट झालेलीं कुळें हीं भाषा ही वंशप्राप्त नसून ' निवळ संस्कार-जन्य आहे ' या सिद्धान्ताचीं समर्पक उदाहरणें होत. महाराष्ट्राच्या दक्षिणेस कानडी व मराठी या भाषांच्या सरहद्दी एकमेकांत मिसळलेल्या आहेत. त्या प्रदेशांत बरेचसे लोक दुभाषी दोन्ही भाषा सारख्याच सफाईने बोलणारे–तर असतातच; शिवाय स्थानत्यागामुळे, शरीरसंबधामुळे किंवा व्यवसाय बदलल्यामुळे एका भाषेच्या छत्राखालील लोक दुसऱ्या भाषेच्या कक्षेंत प्रविष्ट होतात, असाहि प्रकार नेहमी चाललेला असतो. अशीच घडामोड नागपूर प्रांताच्या दक्षिणेस तेलगू व मराठी या दोन भाषांच्या दरम्यान चाललेली नजरेस येते. कित्येक व्यक्ति व घराणीं इतक्या सहजतेने व सफाईने एक भाषा सोडून दुसरीचा स्वीकार करतात की, भाषा ही निवळ संस्काररूप आहे हा भाषाशास्त्रज्ञांचा सिद्धान्त अगदी खरा असल्याचें प्रत्ययास येतें.

भाषाशास्त्राचा हा सिद्धान्त खरा आहे, या-विषयीं वाद नाही. तथापि, काय असेल तें असो, भाषेचा अभिमानमूलक आग्रह माझ्या मनांत कधी घर करूं शकला नाही. भाषाभिमानाचें बाळकडू लहानपणींच ' निबंधमाले'च्या वाचनाने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझ्या अंगीं मुरलें. चिपळूणकरांची भाषाभिमानाची वृत्ति इंग्रजी भाषेचें सावट दूर करून, स्वभाषेला मानाने, उजळ माथ्याने जगवावें, या हेतूने प्रेरित झालेली होती. तीच माझ्याहि अंगीं मुरली. या वृत्तीचें कार्य व उपयोगित्व अजूनहि आहेच. परंतु आपला स्वाभिमान व भाषाभिमान जसजसा वाढीस लागला, तसतसें त्याने कांहींसें अंतःप्रांतीय विग्रहाचें स्वरूप धारण केलें, ही खेदाची गोष्ट होय. महाराष्ट्राच्या दक्षिणेस कानडी-मराठी-वाद निर्माण झाला व त्याने बरेंच उग्र स्वरूप धारण केलें. आपल्या या प्रांतांत हिंदी-मराठी-वाद आहे; तो इतक्या उग्र स्वरूपास पोचलेला नसला, तरी शमीगर्भांतील अग्नीप्रमाणे तो गुप्त आहे, एवढेंच. केव्हा मनें एकमेकांशीं घासतील व केव्हा तो पेट घेईल, याचा नेम नाही.

आपापसांतील हे भाषाविषयक वाद व त्याच्या बुडाशीं असलेली आग्रहाची वृत्ति माझ्या मनास फारशी कधी स्पर्श करूं शकली नाही. या वादांत भाग घेणारे दोन्ही पक्षांचे लोक न्यूनगंडी होत असें माझें मत बनलें आहे. माझी मातृभाषेविषयींची भक्ति जर दृढ व अचल असेल, तर दुसरी भाषा मजवर आक्रमण कशी करील व तिचा मीं दुस्वास करण्याचें तरी कारण काय ? भाषा हें एक व्यवहाराचें साधन आहे. ज्याने त्याने आपल्याला सोयीचें, सुलभ व सहजप्राप्त असें साधन वापरावें, ' एष धर्मः सनातनः । '— प्रश्न कोठे उत्पन्न होतो, तर जेथे असें सुलभ व सहजप्राप्त स्वभाषारूपी साधन उपलब्ध असून, कृत्रिम परिस्थितीमुळे दुसरें अवघड व गैरसोयीचें असें परभाषारूपी साधन लादलें जातें, तेथे या कृत्रिम परिस्थितीला व तिने लादलेल्या अस्वाभाविक साधनाला दूर करून स्वाभाविक स्वभाषारूपी साधनाचा अवलंब करणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्याबरोबरच उलट हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे की, स्वभाषा ही परिस्थित्यनुसार अल्प काळांत बदलूं शकते. रा. काकासाहेब कालेलकरांची मातृभाषा मराठी आहे. परंतु गुजराती ही मातृभाषे-इतकीच त्यांची ' स्वभाषा ' झाली आहे. आणि त्यांच्या मुलांना तर मराठीपेक्षा गुजराती हीच जवळची— अर्थात् ' स्वभाषा '—वाटते. भाषा हा मनुष्याच्या सामाजिक संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे, परंतु तो संस्कारनिर्मित, अर्थात् बराचसा अस्थायी घटक आहे, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

हें विषयांतर बरेंच झालें. परंतु जेथे विषयच नेमलेला नाही, तेथे विषयांतर तरी कशाला म्हणायचें ? मुद्दा सांगत होतों तो हाच की, ' निबन्धमाले ' ने भाषाभिमानाची वृत्ति माझ्या-मध्ये प्रदीप्त केली. लहानपणीं मुंबईस असतां आमच्या चाळींत आठल्ये नांवाचे एक वाङ्मयाभ्यासी गृहस्थ राहत असत. ते आमच्या वडिलांना मधून मधून भेटायला येत. त्यांना आमचे वडील नेहमी सांगत की, ' निबंधमाले ' चें पुस्तक तुम्हांला कोठे पुस्तकविक्रेत्याकडे किंवा मोडक्या बाजारांत मिळालें, तर जरूर आणा. आमच्या मुलाकडून निबन्धमाला वाचवून घ्यायची आहे. मुलांच्या हातीं निबन्धमाला अवश्य दिली पाहिजे. " परंतु वारंवार सांगूनहि आठल्ये मास्तरांना निबन्धमालेचें पुस्तक कांही मिळालें नाही. त्यांनी एक दोन फुटकळ अंक आणून दिले. परंतु त्या वेळीं मोठ्या थाटाने निघत असलेल्या चित्रांनी सजलेल्या 'मनोरंजना' च्या अंकापुढे निबन्धमालेचे ते जीर्ण रोडके अंक माझ्या बालबुद्धीला कःपदार्थ वाटले असल्यास नवल नाही ! नंतर आम्ही जळगांवीं आलों. तेथे ज्या गृहस्थांकडे आम्ही उतरलों होतों, त्यांच्याजवळ वडिलांनी ताबडतोब निबंधमालेविषयीं चौकशी केली; आणि त्या सन्माननीय गृहस्थांनी निबंधमालेच्या कुलकर्णी आवृत्तीचे दोन्ही भाग आणून माझ्या हातीं देतांच मीं त्यांवर उडी घालून ते अधाशासारखे वाचून काढले.

माझ्या वयाच्या अकराव्या वर्षापासून मला वाचनाची गोडी लागली होती व मी जें हातीं पडेल तें वाचीत सुटलों होतों, ही गोष्ट वडिलांच्या नजरेस आली होती. वाटेल तसल्या गदळ व बाष्कळ कादंबऱ्या व नाटकें यांचा मीं सपाटा चालवला होता. या संस्कारक्षम वयांत, वाइटा-कडून चांगल्याकडे वळविण्याला नुसता उपदेश उपयोगी नाही, तर निबन्धमालेसारखें वीरभाव चेतविणारें प्रभावशाली पुस्तकच मुलाच्या हातीं दिलें पाहिजे, हें वडिलांनी हेरलें व त्याप्रमाणे त्यांनी योजनाहि केली. हें त्यांचें मार्मिक अपत्यवात्सल्य

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कधीहि विसरण्याजोगें नाही.

निबन्धमालेने भाषाभिमानाची व देशाभिमानाची दीक्षा दिली आणि स्वभाषेमध्ये लेखन करण्याची प्रेरणा उत्पन्न केली; परकीय सत्तेविषयीं व संस्कृतीविषयीं तिटकारा मनांत उत्पन्न केला. त्या बालवयांत झालेले हे परिणाम भावनामूलक होते. विवेकाचा आधार त्यांना फारसा नव्हता. निबन्धमालेने प्रभावित केलेल्या अवस्थेतून माझें मन पुढे पुष्कळच वाढलें व सार असार पारखण्याचा विवेक करूं लागलें. याची खूण हीच की, पुढे चिपळूणकरां इतकाच रानड्यांचाहि मी भक्त बनलों व चिपळूणकरांनी ज्याच्यावर हेटाळणीची कडक टीका केली होती, त्या ज्योतिबा फुल्यांच्या भूमिकेंतील हितकारक तत्त्व ग्रहण करूं शकलों.

ही परिणति होण्यापूर्वीच सर्वोदयकारी अहिंसावादी तत्त्वज्ञानाचा माझ्या मनाने अंगीकार केला होता. किंबहुना याचा परिणाम होऊनच चिपळूणकर आणि फुले, किंवा टिळक आणि आगरकर या परस्पर विरुद्ध जोड्यांच्या भूमिकांमधील तथ्यांश मी ग्रहण करूं शकलों. मला असें वाटतें की, माझें मन अद्यापि संस्कारक्षम राहिलेलें आहे व तें एकसारखें परिणत होत आहे. तथापि चिपळूणकरांच्या लेखांनी त्याजवर केलेला परिणाम कधींहि पुसून जाणार नाही. त्यांनी माझ्या भावनांना जें वळण व उत्तेजन दिलें, त्यांतील संदेश कायमच आहे व राहील.

देशाभिमानाच्या भावनांना जाज्वल्य, तीव्र आणि तरल स्वरूप देण्यास माझे त्या वेळचे एक मित्र कारणीभूत झाले. डॉ. शंकर दामोदर पेंडसे हे माझ्यापेक्षा वयाने मोठे व देशाभिमानाच्या जाज्वल्य कल्पनांमध्ये पोहून गोते खाल्लेले असे तरुण होते. त्यांच्याकडे माझें मन ओढलें गेलें व आम्ही घनिष्ठ मित्र बनलों. देशस्वातंत्र्याच्या व क्रांतीच्या रोमांचकारी कल्पनांमध्ये आमचीं मनें त्या उगवत्या तारुण्याच्या काळांत विहार करूं लागलीं. सावरकर, धिंग्रा, लाहोर कटांतील लोक, इत्यादि क्रांतिकारकांच्या चरित्रांचें आम्ही अतृप्त मनाने पान करीत असूं. चौदापासून अठरा वीस या वयापर्यंतचा काळ अशा रीतीने उचंबळत्या भावनांची गुप्त रीतीने जोपासना करण्यांत गेला.

परंतु मी अशा परिस्थितींत व वातावरणांत वाढलों होतों की, अशा तऱ्हेच्या भावनांना माझ्या जीवनांत परिस्फुटता मिळणें शक्य नव्हतें. खुद्द पेंडसे हे अनुभवाने सावध बनलेले होते. अर्थात् हा काळ तीव्र कल्पनांमध्ये केवळ विहार करण्यांत गेला. शाळा—कॉलेजांतील अभ्यासक्रमाकडे माझें लक्ष यथातथाच होतें.

बी. ए. झाल्यानंतर माझ्या वृत्तीला कांहींसें व्यासंगीपणाचें वळण लागलें. बी. ए. चें वर्ष हें असहकारिता पर्वाच्या सुरवातीचें वर्ष. देशभक्तांच्या व्याख्यानांची धूमधाम सर्वत्र चालू होती. ' शाळा सोडा, कॉलेजें सोडा '—हा घोष सर्वत्र दुमदुमत होता. देशभक्तांचीं व्याख्यानें ऐकण्यास आम्ही पांच पांच मैल चालत जात असूं. तथापि माझ्या जीवनांत हा काळ भावनांच्या खळबळीचा नसून या सुमारास माझ्या वृत्ति स्थिरावूं लागल्या होत्या. हातीं घेतलेल्या विषयाचा सांगोपांग अभ्यास करावा व त्यांत प्रावीण्य संपादन करावें ही वृत्ति येथून पुढे प्रभावी होऊं लागली. ' मयूर—काव्य-विवेचना'चा मूळ निबंध याच सुमारास लिहिला गेला. परीक्षेच्या विषयांचा अभ्यास पद्धतशीर रीतीने निष्ठापूर्वक झाला व त्याचें फळहि चांगलें पदरांत पडलें.

एम्. ए. झाल्यानंतर बंगालीकडे माझें लक्ष काहीशा आकस्मिक योगायोगाने वळलें. 'विलायतचा प्रवास' कर्ते, जुन्या पिढींतील एक सुप्रसिद्ध विद्वान रावजी भवानराव पावगी हे मिरजेस राहत असत. पावगी हे बी. ए. मध्ये संस्कृतांत पहिले आल्याबद्दल ' भाऊ दाजी प्राइझ ' मिळविलेले विद्वान्, तर माझे वडीलहि मुंबई युनिवर्सिटीचें विनायकराव जगन्नाथ प्राइझ मिळवलेले नांवाजलेले संस्कृतज्ञ ! अर्थात् दोघांचा चांगलाच स्नेह जमला होता. एम्. ए. मध्ये संस्कृतांत पहिला येऊन शिष्यवृत्त्या वगैरे मला मिळाल्याचें पावगींच्या कानांवर गेलें,तेव्हा त्यांनी मला भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. वडिलांनी त्यांच्या भेटीस मला नेलें. भक्तिमार्गी वैष्णव पंथाच्या वाङ्मयाचें अवलोकन त्यांचें होऊन चुकलेलें होतें. श्रीमद्भागवताचें आणि मराठी संतांच्या वाङ्मयाचें माझें अवलोकन त्यावेळीं चाललेलें होतें. अर्थात् त्यासंबंधाच्या गोष्टी बोलण्यांत निघाल्या. त्यांत असें दिसून आलें की, पावगींना बंगाली चांगलें येत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असून त्यांनी चैतन्य देवांच्या वंगीय वैष्णव पंथाचें वाङ्मय वाचलेलें व संगृहीत केलेलें आहे. लागलीच बंगाली मुळाक्षरांचें पुस्तक आणून मीं लिपींची माहिती करून घेतली व दुसऱ्या दिवसापासून बंगाली वाचावयास लागलों. प्रथम बंकिमचंद्राच्या कांहीं कांदबऱ्या वाचल्या व नंतर शिशिरकुमार घोष यांच्या ' अमिय निमाई चरिता ' चे सहा भाग वाचून काढले. पावगींनी माझी आठवण ठेवून मरतेसमयीं चैतन्य पंथाविषयींचे त्यांच्याजवळ असलेले सर्व ग्रंथ मला देऊन टाकले. ' प्रवासी ' हें बंगाली मासिक सुरू करून मीं हा बंगालीचा व्यासंग पुढे कांहीं वर्षे चालू ठेविला होता. विपिनचंद्र पाल यांचें आत्मवृत्त ' प्रवासीं ' त क्रमशः प्रसिद्ध होऊं लागलें होतें, त्याचा अनुवाद 'रत्नाकर' मासिकांत मी करून देत असें.

कॉलेजांतील विद्यार्थ्यांस शिकविण्यासाठी भाषाशास्त्राचा अभ्यास करावा लागला, त्यामुळे संस्कृतोद्भव भाषांची रचना सहजच जाणून घेतां आली. अर्थात् प्रसंग येईल तसें गुजराती वाचूं लागलों. श्री. काका कालेलकरांशीं परिचय होऊन राष्ट्रभाषा प्रचाराशीं व नंतर हिंदुस्तानी प्रचाराशीं संबंध आला, तसें हिंदीचें व उर्दूचेंहि वाचन होऊं लागलें. अर्थात् हें प्रसंगोपात्त व तेवढ्यापुरतें घडत आलेलें आहे. मराठीच्या भाषाभगिनींचा चांगला दृढ व्यासंग माझ्या हातून व्हायला पाहिजे, याची जाणीव मला आहे. परंतु माझ्या हातून तें अद्याप घडलेलें नाही.

जो जो विषय कांहीं प्रसंगानें पुढे येईल, त्याचा व्यासंग तेवढ्यापुरता करावा आणि मग कांहीं काळानें तो विषय मागे पडावा, दुसऱ्यानें त्याची जागा घ्यावी, असें माझ्या आयुष्यांत फार झालेलें आहे. ज्याचें थोडेंबहुत तरी अवलोकन केलेलें नाही, असा बहुधा एकहि विषय राहिलेला नसेल. तथापि एकाहि विषयाचा दीर्घ काल व्यासंग करून त्यांत पारंगतता मिळविण्याचें मला जमलेलें नाही. हें माझें मला समजतें व मनाला बोचतें देखील. परंतु या फुटकळपणाच्या वृत्तीला मी अद्याप आळा घालूं शकलेलों नाही. कदाचित् माझा स्वभावधर्मच तसा असेल. ' स्वभावो दुरतिक्रमः ' !

अध्यापकाचा पेशा पतकरल्यानंतर एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना शिकविण्याचा प्रसंग आला, तेव्हा भाषाशास्त्राचा व्यासंग बऱ्याच कसोशीने केला. परंतु एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना शिकवायला फार थोडें ज्ञान पुरतें आणि एकदा साठविलेली पुंजी पुष्कळ काळपर्यंत चालू शकते. त्यामुळे या अभ्यासाची वाटहि अकालींच खुंटली. स्वतःच्या आवडीनें स्वयंस्फूर्तीनें हातीं घेतलेला व फुरसत मिळेल त्याप्रमाणे चालू ठेवलेला एक विषय म्हणजे नाट्य व रंगभूमि हा होय. मराठी नाटकांच्या व रंगभूमीच्या अभ्यासास सुरवात करून वीस वर्षे झालीं. अजून त्या विषयाचा नाद सुटलेला नाही. कांहीं लेख व भाषणें यांपेक्षा माझ्या व्यासंगाचें भरीव फळ वाङ्मयरूपानें मी अद्याप देऊं शकलों नाहीं. ' रंगभूमीच्या इतिहास ग्रंथा ' च्या रूपानें तसें फळ मराठी वाचकांस लवकरच देतां येईल अशी आशा मी बाळगून आहें.

' नवभारत ग्रंथमाले ' ची सुरवात १९३१ सालीं झाली. तेथूनच माझ्या जीवनांतील संघटनापर्व सुरू झालें व व्यासंगीपणाचा कालखंड संपुष्टांत येऊं लागला, असें म्हणण्यास हरकत नाही. एखादा लेख, निबंध किंवा भाषण लिहिण्याचा बोजा अंगावर येऊन पडला म्हणजे तेवढ्यापुरतें अवलोकन करावें, पूर्वी झालेल्या व्यासंगाच्या पुंजीचाहि उपयोग करावा, आणि तेवढा प्रसंग साजरा करावा असेंच आजपर्यंत चालत आलें आहे गेल्या चौदा पंधरा वर्षांतील बाकीचा फुरसतीचा काळ अनेक लोकोपयोगी संस्थांची संघटना व उभारणी करण्यांत गेला आहे. ' नवभारत ग्रंथमाला ' निवाली, अल्पावधींत तिचें नांव सर्वतोमुखीं झालें. ' अभिनव नाट्यमंदिर ', ' महाराष्ट्र नाट्य संमेलन, ' ' ॲकॅडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट ' या संस्था चालू झाल्या. महाराष्ट्र साहित्य संमेलन, भारतीय साहित्य परिषद इत्यादि संस्थांच्या संघटनेंत व संचालनांत यथाशक्ति भाग घेतला. 'विदर्भ साहित्य संघा' च्या पुनरुज्जीवनास यथाशक्ति हातभार लावला; तो इतिहास सध्या सर्वांसमोर आहेच.

या संस्थासंचालनाच्या कामांत आपल्याला कितपत सफलता प्राप्त झाली आहे, असा जेव्हा मीच माझ्या मनाला प्रश्न करितों, तेव्हा त्याला निरनिराळ्या प्रकारचीं उत्तरें मिळतात. बाह्यात्कारीं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहिलें, तर संस्थांचें कार्य, एकंदरीनें ठीक चाललेलें दिसतें. अप्रशस्त असा बोभाटा कोणत्याहि संस्थे-संबंधानें नाही. तथापि या संस्थांच्या द्वारा समुदायाचें संघटन कितपत होऊं शकलें व सार्वजनिक हितबुद्धीनें कार्य करण्याची प्रवृत्ति कितपत बळावली, या दृष्टीनें जर पाहिलें, तर खर्ची पडलेल्या परिश्रमांच्या मानानें फलप्राप्ति अल्प प्रमाणांत झालेली आढळेल, असें मला वाटतें. या असफलतेमुळे मन निराश विषण्ण होण्याचे प्रसंग वारंवार येतात. कॉलेजाकॉलेजांतून निरनिराळे विषय शिकविणारे शेंकडो महाराष्ट्रीय विद्वान् आहेत. परंतु 'नवभारत ग्रंथमाले' करितां त्यांजकडून ग्रंथ लिहून मिळावे यासाठीं जिवाचें रान केलें, तरी त्यांतून फलप्राप्ति हाताच्या बोटांवर मोजण्यापेक्षा अधिक ग्रंथांची होऊं शकली नाही–'अस्पृश्यतेचा प्रश्न,' 'राजपूत संस्कृति,' 'बालकांचा मनोविकास', 'जगाच्या राजकारणांत' इ० न. भा. ग्रं. मालेंतील नामांकित ग्रंथ विद्यालयीन विद्वानांखेरीज इतरांनीच लिहिले आहेत. कांहीं मित्र म्हणत, "इतरांकडून ग्रंथ मिळविण्याचा एवढा आटापिटा करण्यापेक्षा तुम्ही स्वतःच वर्षातून एक दोन ग्रंथ लिहून आपली माला कां गुंफीत नाही. पुष्कळशा विषयांवर सामान्य वाचकांच्या दर्जास पुरे पडतील, असे ग्रंथ तुम्हांला सहज लिहितां येतील. पत्रांचे निष्फळ भारे लिहिण्याचे तुमचे श्रम वाचतील व तुमचें काम स्वावलंबी व सुखाचें होईल." मित्रांचें म्हणणें खोटें नव्हतें. परंतु आम्ही पडलों ध्येयवादी! 'ध्येयें म्हणजे दुःखें' असें कांहींसें वामनराव जोशांनी म्हटलें आहे, तेंच खरें. आधुनिक विद्वानांमध्ये स्वभाषेमध्ये ग्रंथ लिहून ज्ञानप्रसार करण्याची प्रवृत्ति वाढावी यासाठीं झटाव, असें मला वाटे. स्वतःच्या नेहमींच्या व्यासंगाच्या विषयांवर ग्रंथ लिहिणाऱ्याचें तेज कांहीं निराळेंच पडतें. परंतु असे व्यासंगी विद्वान् गुंगारा देण्यांतहि चांगलेच सरावलेले असतात! त्यांना आपली विद्वत्ता, व्यासंग, आणखी जें कांहीं असेलनसेल तें वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखविण्याची जितकी उत्सुकता असते, तिच्या दशांशानें लोकांना दाखविण्याची जर आस्था असती, तर 'नवभारत ग्रंथमाले' मध्ये एव्हाना १९ च्या ऐवजी ३९ ग्रंथ सहज प्रसिद्ध होऊं शकले असते. तथापि अशाहि अवस्थेंत मिराशी, अजरेकर, अळतेकर, पुणतांबेकर, अशा अखिल भारतीय कीर्तीच्या विद्वनांचे ग्रंथ 'नवभारत ग्रंथ माला' मराठी वाचकांसमोर आणूं शकलों, एवढ्यानें माझ्या प्रयत्नांचें सार्थक झालें, असें मी समजतों.

सार्वजनिक संस्थांच्या संचालनाचा अनुभवहि तसाच. निकटचीं मंडळी म्हणतात, "याला भेट, त्याच्याकडे खेटे घाल, हें काम अंगावर घे, ती समिति स्थापन कर, याविणें काय तुमचें अडलें आहे? संस्थेसाठीं एकट्यानें कां म्हणून मरावें? असेल लोकांना जरूर, तर कोणीहि त्या कामाची काळजी घेईल? तुम्ही कां म्हणून त्यासाठीं सुखाचा जीव दुःखांत घालतां?" याला खरें उत्तर 'स्वभावो दुरतिक्रमः' हेंच आहे! आमचा प्रकृति–धर्म म्हणून आम्ही हें करतों. यांत पैशांची नुकसानी आहे, शरीराची खराबी आहे, वेळेचा व्यय आहे, लोकांचा उपहास सहन करणें आहे, हें आम्हांला दिसत नाही असें थोडेंच आहे? समजतें पण उमजत नाही, अशांतली ही गोष्ट आहे. असें वाटतें कीं, चार लोकांनी एकत्र यावें, स्वार्थनिरपेक्ष वृत्तीनें समाजाच्या सांस्कृतिक प्रगतीच्या अनेक मार्गांचा विचार करावा आणि संघटित रीतीनें कांहीं कार्य करावें. समुदायशक्तीची वाढ करण्याचा आणि सामाजिक-जीवन समृद्ध करण्याचा मार्ग हाच आहे. एरवीं जो तो आपापल्यापुरते पैसे मिळवून जगतोच आहे. परंतु तात्त्विक दृष्ट्या पाहिलें असतां, पशुपक्ष्यांच्या जीवनापेक्षा त्यांत अधिक उच्चता नाही.

आणखी विचार केला असतां असें मनांत येतें कीं, सत्तेचा जोर नाही, पैशाचा लोभ नाही, लोकप्रियतेचा मोह नाही, अशा या क्षेत्रामध्ये कांहीं थोडी तरी संघटना आपण निर्माण करूं शकतों; चार लोकांनाच का होईना एकत्र आणूं शकतों, ही काय कमी समाधानाची गोष्ट आहे? सरकारी वा निमसरकारी संस्थांचें जें काम चालतें, त्याच्या प्रेरकशक्ति सत्ता किंवा प्रलोभन या असतात. त्यांच्या द्वारा केवढेंहि काम झालें, तरी त्याच्या योगानें लोकांची दानत, त्यांची सामुदायिक इच्छाशक्ति यांची वाढ होत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. याच्या उलट लोकांच्या इच्छेने निर्माण झालेल्या संस्थांचा आधार लोकहितबुद्धि हाच असूं शकतो. अशा संस्थेमध्ये चारच लोक जमले, तरी ते लोकहितबुद्धीने स्वयंप्रेरणेने जमलेले असतात. या स्वयंप्रेरित कार्यशक्तीच्या योगाने समाजाची दानत वाढते, त्याच्यांत चैतन्य व प्रगतीची इच्छा निर्माण होते. या संस्थांचें काम समाजजीवनाच्या उन्नतीच्या दृष्टीने ' यत्स्वल्पमपि तद्बहु ' असें असतें. तेव्हा अशा संस्थांच्या कामांत मीं माझ्या शक्तीचा जो व्यय केला तो व्यर्थ गेला, असें मीं कां मानावें ? ज्ञानप्रद असूनहि वाङ्मय दृष्ट्या उच्च दर्जाचे अशा ग्रंथांचें पद्धतशीर प्रकाशन मराठींत यशस्वी होऊं शकतें, ही ' नवभारत ग्रंथमाले'ने सिद्ध केलेली गोष्ट सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने काय कमी मोलाची आहे ? ठिकठिकाणीं झालेल्या रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवांमुळे रंगभूमीच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न पुष्कळ ठिकाणीं सुरू झाले. रंगभूमीच्या भावी उन्नतीची दिशा कोणती, याची मूलग्राही चर्चा झाली, आणि अनेक ठिकाणीं उत्साही नाट्यमंडळें अस्तित्वांत आलीं, ही पदरांत पडलेली कमाई कांही कमी नाही. माझा संबंध ज्या ज्या संस्थांशीं आला, त्या त्या संस्थांनी समाजाच्या सांस्कृतिक प्रगतीचा, अत्यल्प का होई ना, बोजा उचलण्याचा प्रयत्न केला आहे, ही जाणीव, मोठ्या थोरल्या द्रव्यलाभानें किंवा मानसन्मानाने मिळणार नाही, असें समाधान मला देऊं शकते.

कांही मित्रांचा अभिप्राय असा पडतो की, संस्थांचे संघटन व संचालन करण्याच्या भानगडींत न पडतां मीं एकमार्गीपणाने ग्रंथलेखन केलें असतें, तर तें अधिक उपयुक्त ठरलें असतें. परंतु वर सूचित केल्याप्रमाणे हें ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्मावर अवलंबून आहे. ' प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ' हेंच अखेर खरें ठरतें. शिवाय संस्थासंचालन व वाङ्मयनिर्मिति यांत अधिक महत्त्वाचें कोणतें, हें ठरविणारें माप तरी कोणाजवळ आहे ?

मनुष्यांचे प्रकृतिधर्महि कदाचित् कालगतीनें थोडेबहुत बदलत असतील. माझ्या जीवनांत भिन्न भिन्न काळीं प्रभावी झालेल्या भिन्न प्रवृत्तींचा उल्लेख मीं मागे केलाच आहे. ज्याला मीं संघटनापर्व म्हटलें आहे, तो माझ्या आयुष्यांतील कालखंड संपून यापुढे कदाचित् वाङ्मयनिर्मितीचा कालखंड येणार असेल, कोणी सांगावें ! पुष्कळ ग्रंथांच्या योजना मनांत घोळताहेत व कांही तर जाहीरहि झाल्या आहेत. जाहीर झालेले संकल्प पुरे करणें हें घेतलेलें कर्ज फेडण्याइतकें निकडीचें कर्तव्य आहे. परंतु सामान्यतः माझ्या हातून लेखन फार थोडें होतें. ' वेळेचा अभाव ' या कायम ठशाच्या कारणाखेरीज याला दुसरें एक मोठें कारण आहे. माझी स्वभावतः प्रवृत्ति लेखनाकडे नाही. माझी प्रकृति आदानतत्पर (Receptive) आहे, प्रदानतत्पर (Expressive) नाही. माझें भाषण प्रसंग विशेषीं चांगलें रंगत असलें आणि माहिती व युक्तिवाद यांनी तें भरलेलें असलें, तरी माझ्या अंगीं वक्तृत्व गुण नाही. त्याचप्रमाणे लेखन करण्यालाहि मला बरेच आयास पडतात. दुसऱ्याने लिहिलेलें वाचणें, त्याचा आस्वाद घेणें, तसेंच दुसऱ्याचें बोलणें ऐकणें, त्यांतील खुब्या अनुभवणें, हें मला मनापासून आवडतें. असें असल्यामुळे दुसऱ्याच्या आग्रहास्तव व भागच पडल्याशिवाय माझ्या हातून सहसा लेखन होत नाही. नवभारत ग्रंथ मालेसाठी पहिला ग्रंथ दुसऱ्याने लिहिण्याचें कबूल केलें होतें. त्याने आपलें आश्वासन पुरें न केल्यामुळे मला नेट लावून 'ज्ञानोपासना' लिहिणें भागच पडलें.

आजपर्यंत मीं केलेलें लिखाण बहुतेक समालोचनात्मक व थोडेंसें संशोधनात्मक आहे. सर्जनात्मक आणि ललित स्वरूपाचें लिखाण मला आवडत नाही, किंवा तें मी कमी दर्जाचें समजतों, असें मुळींच नव्हे. उलट तें मी फार महत्त्वाचें व तितकेंच जबाबदारीचें समजतों. आणि म्हणूनच कादंबरी, नाटक इत्यादि ललित वाङ्मयाच्या दालनांमध्ये प्रवेश करण्यास मी अजूनपर्यंत धजलेलों नाहीं. कादंबरी, नाटक या प्रकारांविषयीं माझ्या भावना फारच उच्च आहेत. अशा भावनांमुळेच प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या हातांत धराव्या असें सहसा वाटत नाही. प्रत्येक प्रसंग, घटना, संवाद, वर्णन कलेच्या अत्युच्च कसोटीस उतरलें पाहिजे, तर तें खरें कादंबरीलेखन ! तसें आपल्या हातून कसें उतरेल या विवंचनेमुळे, आणि तितकें कलाकौशल्य साधण्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहिजे तितका सावचितपणा नसल्यामुळे, मीं ललित वाङ्मयाच्या क्षेत्रांत पदार्पण केलेलें नाही. अनेक कादंबऱ्यांचीं व नाटकांचीं कथानकें माझ्या मनांत वर्षानुवर्षे घोळत असतात. त्यांना प्रकट स्वरूप कधीच प्राप्त होणार नाही व तीं माझ्याबरोबर विलयाला जातील असा बहुधा रंग दिसतो. एका कादंबरीचें कथानक तर गेलीं बावीस वर्षे माझ्या मनांत वागत आहे, हें कोणाला सांगितलें तर खरें वाटणार नाही ! ज्या वेळीं तें मनाने रचलें त्यावेळीं त्यावर कादंबरी लिहिली असती, तर ती सामाजिक कादंबरी झाली असती, आता मीं लिहिली तर कदाचित् ऐतिहासिक कादंबरी होईल ! असें होऊं नये व कथानकाला अद्ययावत्पणा यावा, म्हणून मीं त्यांत वेळोवेळीं फेरफारहि केले आहेत. परंतु हें सर्व मनांतल्या मनांत ! बाहेर चकार शब्द नाही. लेखक–वर्गामध्ये इतका संयम करणाऱ्याचें उदाहरण दुसरें क्वचित् घडलें असेल !

हा गौप्यगोपनाचा जो विक्रम मीं केला आहे, त्यातील रहस्य हेंच की माझी स्वतःची भूमिका कृतिप्रधान आहे, शब्दप्रधान नाही. जीवनाचें सार कृतींत आहे, निवळ लिहिण्याबोलण्यांत नाही. हें केवळ विचार करून ठरविलेलें तत्त्व म्हणून मी मानतों असें नव्हे, तर माझी प्रकृतिच तशी आहे. मनःकल्पित ध्येयानुसार कृति करून दाखविण्यांत व त्यासाठी धडपडण्यांतच माझ्या आयुष्याचा मुख्यांश आजवर खर्ची पडला आहे व पुढेहि तसाच पडावा, अशी इच्छा आहे. लेखन त्याच्या अनुषंगाने जितकें येईल तितकें येवो — त्यातहि ललित लेखन अगत्याने येवो ! परंतु लेखन हाच प्रधान जीवनहेतु कधी बनेल किंवा बनावा, असें सध्या तरी वाटत नाही. पुढे काय होईल, कोणीं सांगावें ?

महदंबेचे धवळे आणि नाथांचें रुक्मिणीस्वयंवर

प्रा० अच्युत नारायण देशपांडे, एम्. ए.

नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमधील प्रा. अ. ना. देशपांडे हे तरुण व व्यासंगी साहित्यिक आहेत. एवढ्यांत त्यांचे जे कांही लेख नियतकालिकांत झळकले आहेत, त्यांवरून प्रा. देशपांडे यांनी स्वतः-विषयीं फार अपेक्षा निर्माण केल्या आहेत. ते जसे विद्वान्, तसेच रसिकहि आहेत.

प्रस्तुत लेख प्रा. देशपांडे यांच्या लेखनपटुत्वाचा प्रत्यय आणून देणारा असाच आहे.

रुक्मिणीस्वयंवराच्या कथेने महाराष्ट्रकविप्रतिभेला घातलेली मोहनी खरोखर विलक्षणच म्हटली पाहिजे; कारण तेराव्या शतकापासून थेट आजतागायतच्या मराठींतील कितीतरी प्रथितयश कवींनी ती कथा आपापल्या परीने आनंदाने व कौशल्याने आळविली आहे. रुक्मिणीस्वयंवरासारख्या अवीट गोडीने भरलेल्या ह्या परममनोरम प्रसंगावर मराठी कवींनी गुंफलेल्या अनेक काव्य-कुसुममालांची आपापसांत तुलना करून त्यांपैकी रूपरंगसुवासादि गुणांनी श्रेष्ठकनिष्ठ कोणती, हें ठरविणें व ह्याच गुणांच्या बाबतींत मूळ मालेशीं त्यांची तुलना करणें, हा विषय अभ्यासाच्या दृष्टीने निस्संशय अत्यंत मनोरंजक व उद्बोधक होईल. पण प्रस्तुत लेखांत एवढ्या व्यापक विषयाला हात न घालता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपरिनिर्दिष्ट मालांपैकी अत्यंत प्रसिद्धि पावलेल्या अशा फक्त दोन मालांची तुलना–तीहि अगदी संक्षेपाने–करण्याचें योजिलें आहे.

आणि, त्या दोन माला म्हणजे महदंबेने गाइलेले गोड धवळे आणि नाथांचें नांवाजलेलें रुक्मिणी-स्वयंवर. पैकी, नाथ नशीबवान खरे; कारण त्यांच्या 'स्वयंवरा'ला आख्या महाराष्ट्रांत 'लौकिक पठनाचें अधिष्ठान' मिळण्याइतकी सार्वत्रिक लोकप्रियता मिळाली आहे. आधुनिक काळांत सुद्धा भावे व पांगारकरांसारख्या जातीच्या वाङ्मयभक्तांनी 'स्वयंवरा'ला उत्तम शिफारसपत्रें बहाल केलीं आहेत.

आणि महदंबेची लोकप्रियता? तिला कुठली आली लोकप्रियता? ज्या वारकरीपंथाचा गेलीं पांच-सहाशें वर्षे सारखा डंका वाजत आहे, त्या पंथाचे एक अध्वर्यु असलेले आणि ज्यांच्या ग्रंथांची काशीस्थ विद्वज्जनांनी पालखींतून मिरवणूक काढावी एवढें कीर्ति-वैभव पावलेले एकनाथ कोणीकडे आणि परवापरवापर्यंत ज्या पंथाची सुशिक्षित वाङ्मयभक्तांकडून सुद्धा अवहेलनापूर्वक उपेक्षा केली जात होती व अजूनहि ज्या पंथाबद्दल श्रद्धायुक्त व आस्थेवाईक अभ्यास जितका वाटायला पाहिजे, तितका वाटला नाही त्या पंथांतली एक विधवा, अशिक्षित, वृद्धा महदंबा कोणीकडे? तेव्हा साहजिकच केवळ लोकप्रियतेचा कौल लक्ष्यांत घेऊन रुक्मिणीस्वयंवराच्या प्रसंगावर रचलेल्या उपरिनिर्दिष्ट दोन काव्यांची सरसनीरसता ठरविणें अन्यायाचें होईल; त्या बाबतींत रसिकतेचा कौल काय पडतो, तेच पाहणें इष्ट व न्याय्य होईल, असें वाटतें.

'स्वयंवर' आणि 'धवळे' या दोहोंचें वाचन केलें असतां, एक फार मोठा फरक सकृत्दर्शनींच जाणवतो. तो हा की, 'स्वयंवर' वाचलें असतां तें एखाद्या वेदान्तजड व्यक्तीने लिहिलें आहे, असें वाटूं लागतें आणि तें खरेंहि आहे. 'स्वयंवर' वाचलें असतां लिहिण्यापूर्वी नाथांनी नुकतेंच चतुःश्लोकी भागवत व एकादशस्कंधावरील टीका हे अध्यात्म-प्रधान ग्रंथ लिहून हातावेगळे केले होते; त्यामुळे अध्यात्माच्या संस्कारांचें मनावर दाट आवरण असतांनाच 'स्वयंवर' लिहिलें गेलें; म्हणून सारी कृष्णरुक्मिणीविवाहाची गोड कथा अध्यात्मांत बराच वेळ मुरत ठेवून नंतर बुचकळून काढलेली दिसते. ह्या अध्यात्मपरतेमुळे 'स्वयंवरा' ला एक प्रकारचें जाड्य आलें आहे. त्याच्या कथनांत प्रवाहित्व मुळींच उरलें नाहीं; ठायीं ठायीं आध्यात्मिक उपमानांच्या ओंडक्यांनीं कथेचा ओघ उगीचच अडवून धरला आहे. त्यामुळे भावनोत्कट रम्योदात्त व रोमहर्षक प्रसंगांनी भरलेली रुक्मिणीच्या विवाहाची कहाणी सोत्कंठित हृदयाने वाचावयास निघालेल्या कथाप्रिय वाचकाचा विरस होतो, आणि "तुम्हाला जिवाशिवाचेंच लग्न लावायचें होतें, तर तें सरळ लावून टाकायचें असतें, त्याकरिता कृष्णरुक्मिणीच्या विवाहाच्या आड आपण कां दडलात?"–असा सरळ सवाल नाथांना विचारावासा वाटतो.

नाही तर, महदंबेचे धवळे पाहा. गतिमानत्व किंवा प्रवाहित्व हा तर मुळीं त्यांचा प्राणच आहे. बोजड अलंकारांची बेमाप उपयोजना आणि वर्णनांतला फाजील पाल्हाळिकपणा ह्या दोन कारणांमुळे कथानकाची गतिमानता नष्ट होते–जशी ती 'स्वयंवरां'त नष्ट झालेली आहे तशी. महदंबेने मात्र अवजड अलंकारांचें ओझें लादून आपल्या भाषेचा ओघ मंदावूं दिला नाही, किंवा पाल्हाळिक वर्णनांनी कथानकाचा ओघ अडविला नाही. भीमकाच्या कुळीं रुक्मिणीचा अवतार झाला व 'रावो' तिच्या लग्नाची चिंता करूं लागला–अशी कथानकाच्या गाभ्यालाच एकदम हात घालणारी सुरवात करून, महदंबेने सरळ क्रमाने सारी कथा सांगून टाकली आहे व नारदाच्या गोड थट्टेनें तिचा शेवट केला आहे. महदंबेचें सारें लक्ष्य कृष्णरुक्मिणीच्या लग्नाची गोष्ट सांगण्याकडे आहे; नाथांचें लक्ष्य गोष्ट सांगण्याकडे कमी असून कृष्णाचें देवत्व पटवून देण्याकडे व जीवशिवैक्याचा–अद्वैताचा–महिमा बिंबविण्याकडेच जास्त आहे; त्याकरिताच तर त्यांनी आपल्या काव्यांत आध्यात्मिक उपमानांचा अतिरेक होण्याइतका उपयोग केला आहे.

कवयित्रीचें लक्ष्य मुख्यतः गोष्ट सांगण्याकडे असल्यामुळे, धवळ्यांतील वर्णनांत फार आटोपशीरपणा आला आहे. उ०: कृष्णाकडील वीर व शिशुपालाकडील वीर ह्यांच्यांतील युद्धाचें वर्णन महदंबेने फक्त २–३ कडव्यांतच केलें आहे; नाथांनी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तर त्याकरिता ८ ते १२ असे ५ अध्याय दिले आहेत. पुन्हा, इतक्या विस्ताराने व पाल्हाळाने केलेल्या युद्धवर्णनांत, ओजोगुणाचा अभाव असल्यामुळे, वीररसाचा व्हावा तसा उठाव झालेला नाही. शिवाय, वेदान्तविषयक उपमानांच्या अतिरिक्त उपयोजनेमुळे वीररसाच्या साऱ्या वर्णनांत एक प्रकारचा मिळमिळीतपणा व लिबलिबीतपणा आला आहे, तो निराळाच.

ह्या आध्यात्मिकतेचे तर नाथांनी इतके लाड पुरविले आहेत की, यापुढे त्यांनी औचित्यभंगाची सुद्धा क्षिति बाळगलेली दिसत नाही. मनोभावनांच्या वर्णनापासून तों स्वायंवेयांच्या व स्तनांच्या वर्णनापर्यंत सर्वत्र आध्यात्मिक उपमानांचा सुळसुळाट; त्यांत योजकता नाही, सारासार विचार नाही व सहजताहि नाही. महदंबेनेहि आध्यात्मिक उपमानांचा उपयोग एका ठिकाणीं केला आहे, पण तो किती संयमपूर्ण, समयोचित व परिणामकारक रीतीने केलेला आहे. देवळांतून देवीची पूजा करून बाहेर निघालेल्या रुक्मिणीला कृष्णाने रथांत उचलून घेतलें, त्यावेळीं महदंबेने रुक्मिणीच्या तोंडीं **'अमूर्त ब्रह्म केलें मूर्तासि आलें'** असें वाक्य घातलें आहे. किती योग्य व उत्कट वाक्य आहे हें! त्यांत तुमच्या त्या नाथांचें अध्यात्महि आहे. व रसिकांचें काव्यहि आहे.

रुक्मिणीस्वयंवराच्या कथेंत स्वभावतःच शृंगाररसाच्या उठावाला बराच अवकाश आहे, हें खरें असलें, तरी त्या रसाच्या आविष्कारांत महदंबेने नाथांपेक्षा अधिक उच्च संस्कृति व अभिरुचि प्रकट केली आहे, असें म्हणावें लागतें. महदंबेने रुक्मिणीच्या शारीरिक सौंदर्याचें वर्णन मुळींच केलेलें नाही. पण त्यामुळे रुक्मिणीचें स्वभावचित्रण यशस्वी करण्यांतहि कांही उणेपणा आलेला नाही. तिची कृष्णमीलनविषयक उत्कंठा किंवा तिची विरहावस्था तिने फारच परिणामकारक व उत्कट रीतीने वर्णिलेली आहे. पुन्हा, त्या विरह-वर्णनांत संस्कृत काव्यांतील वर्णनांचा ठराविक साचा नाही. उलट, नाथांनी तर रुक्मिणीच्या शारीरिक सौंदर्याचें अवयवशः वर्णन केलें आहे. त्यांच्यासारख्या वेदान्तांत मुरलेल्या परमार्थप्रवण व्यक्तीने स्तनांच्या व नाकांतील श्लेष्माच्या वर्णनांत रमावें, हें ज़रा चमत्कारिकच नव्हे काय?

सदभिरुचीच्या मुद्याशींच अगदी संलग्न असा आणखी एक प्रसंग आहे. रुक्मि याचा पराभव करून त्याला पकडल्यानंतर त्याची कृष्णाने फजिती केली. त्या फजितीचें वर्णन चर्वण करण्याइतकें खास गोड नाही. महदंबेने तो प्रसंग अगदी थोडक्यांत वर्णिला आहे. नाथ तर त्याहि वर्णनांत रमलेले आढळतात. 'स्वयंवरा' च्या बाराव्या प्रसंगाच्या शेवटीं कृष्णाने केलेल्या मेहुण्याच्या विनोदाने सदभिरुचीची सुसंस्कृततेची मर्यादा ओलांडली आहे, असें म्हणावें लागतें.

कथानकाच्या गुंफणीच्या बाबतींत गतिमानत्व हें जसें धवळ्यांचें प्रमुख वैशिष्ट्य आहे, त्याप्रमाणे स्वभावचित्रणाच्या बाबतींत पात्रांचा जिवंतपणा हा त्यांचा स्पृहणीय विशेष आहे. नाथांच्या 'स्वयंवरां'तील स्वभावचित्रण धवळ्यांतील स्वभावचित्रणाशीं ताडून पाहिलें असता, हा विशेष तर उठून दिसतो आणि 'स्वयंवरां'तील पात्रें निर्जीव, निष्क्रिय वाटूं लागतात. कांही प्रसंग पाहा:—

(अ) अंबिकापुराकडे जातांना श्रीकृष्णाची शहरांतून मिरवणूक काढतात. नागरिकांची कृष्णदर्शनार्थ अलोट गर्दी जमते. त्यावेळीं नाथांच्या अध्यात्मजड कृष्णाचा थाट पाहा:—

'घेऊन निजबोधाची वेताटी। विवेक दृश्यांची मांदी लोटी। तैसा सात्त्विक जगजेठी। जनसंकुलता वारित॥'

उलट, त्याच प्रसंगीं महदंबेचा कृष्ण किती मनुष्यस्वभावानुरूप वागतो तें पाहा: **'तंव देवें रथु थीरु केला कृपादृष्टि अवलोकीलें गोविंदें॥'** भक्तजनांचें मनोगत पूर्ण करण्याकरिता श्रीकृष्णाने आपला रथ स्थिर करणें हें किती स्वाभाविक व प्रसंगोचित वाटतें.

(आ) वरील प्रसंगींच कृष्ण अंबिकापुरीं जाण्यासाठी शहरांतून जातो; त्यावेळीं नाथांची रुक्मिणी दर्शनोत्सुक होऊन सौधावर कृष्णाला पाहायला येत नाही. महदंबेने त्यावेळची तिची दर्शनलालसा किती उत्कटत्वाने व सौम्य अतिशयोक्तीने वर्णन केली आहे:

'सौंदरु श्रीकृष्णु देखियला झळकतां: तंव तियचें आकर्षिलें चीत: केसी

संभ्रमीत जाली माडावरूनिया घालूं पाहे झेप।''

(इ) आणखी एक प्रसंग. रुक्मिणी सुदेवाला बोलावते, त्यावेळीं नाथ लिहितात: **"ऐसें विचारूनि जाण। निजभावाचा ब्राह्मण। आप्त पाचारिला सज्ञान। अतिगहन विवेकी॥"** ह्यांत चित्रिलेला नाथांचा सुदेव केवळ सांगकाम्या आहे, रुक्मिणीच्या सुखदुःखाची चौकशी करण्याइतकी सहृदयता किंवा समयसूचकता त्याच्या ठिकाणीं नाही.

नाहीतर, महदंबेचा सुदेव पाहा. तो किती जिवंत वाटतो! रुक्मिणीने **"सखि घाडूनिया सुदेवो आफाविला: तियेतें देखौनि वींप्र पुसो लागला: तूं का वो दैन्यवदन सोके व्याकुळ भीमका बाळे: रुक्मिणी म्हणे ताता उपेक्षेलिय कृष्णें गोपाळें."** सुदेवाचें रुक्मिणीच्या शोकाचें कारण वडिलधारा मनुष्य या नात्याने विचारणें व रुक्मिणीने त्याला दिलेलें उत्तर–हा भाग मनुष्य स्वभावाला किती धरून आहे!

(ई) रुक्मिणीच्या कृष्णप्रीतीची गाढता सुचविण्याकरिता महदंबेने एक गोड प्रसंग निर्माण केला आहे. उष्टावणाच्या वेळचा तो प्रसंग आहे. कृष्णाचें जेवण झाल्यावर **'वाट पाहात असे देवा रुक्मिणी राणी'**— कशाकरिता? **'परियळ न्या वेगीं ते स्वीकारी ना आणीकें अन्नें'** त्या परियळांत काय असतें? त्यांत उच्छिष्ट तर असतेंच, पण कृष्णाने त्यांत आपल्या प्रीतीचें प्रतीक म्हणून आपल्या गळ्यांतील हार ठेवलेला रुक्मिणीला आढळतो. **'रुक्मिणी तार्टी देखियला हारु: कस्तुभवरि लेजो सारंगधरु:'** उष्टावणाच्या ताटांत प्रीतीचें चिन्ह म्हणून कृष्णाने हार ठेवण्याची कल्पना म्हणजे महदंबेच्या सात्त्विक रसिकतेचा व स्वतंत्र प्रतिभेचा पुरावाच नव्हे काय? हा हाराचा प्रसंग 'स्वयंवरां'त नाहीं; आणि वेदान्तजड नाथांना इतका रसोत्कट व रम्य प्रसंग सुचला नाहीं, तर नवल नाही.

(उ) रुक्मिणीच्या सख्यांच्या स्वभावचित्रणाची तुलना अशीच उद्बोधक ठरेल. नाथांनी 'स्वयंवरां'त त्या सख्यांना वेदान्ताची जबरदस्त मात्रा दिल्यामुळेच की काय, त्या अगदी निष्क्रिय व जड बनलेल्या आहेत; त्या कांहींच हालचाल करीत नाहींत की, कांहीं बोलत नाहींत.

उलट धवळ्यांतील सख्या खरोखरीच्या सजीव सख्या वाटतात. उष्टावनानंतर रुक्मिणी युवतिसुलभ वृत्तीने आपल्या सख्यांना कृष्णाबद्दल विचारते: **"कैसा रूपें गुणें?"** तेव्हा सख्या म्हणतात: **"लागलें प्रेमपिसें जेव्हळि देखिले श्रीजगनाथु: सर्वांगीं न देखों तुमचा वो कांतु: तुझा पती आम्हा पीता दुजा नाठवे विचारु:"** सख्यांनीं दिलेलें हें मार्मिक व उच्च अभिरुचीचें निदर्शक असें उत्तर महदंबेच्या रसिकतेची साक्षच देत नाहीं काय?

दोन्ही काव्यांतील कांहीं प्रसंगांच्या तुलनात्मक दर्शनाने हेंच नाही का सिद्ध होत की, व्यक्तिदर्शनकलेंत महदंबेने नाथावर कडी केलेली आहे?

उपरिनिर्दिष्ट विवेचनावरून नाथांच्या 'स्वयंवरां'त काव्यदृष्ट्या सौंदर्यस्थळें मुळींच नाहीत, असा मात्र वाचकांनी गैरसमज करून घेऊं नये. पहिल्याच अध्यायांतील कृष्णाचें वर्णन व त्यांतहि प्रथम पायांचें व शेवटीं मुखाचें वर्णन करण्यांत दाखविलेलें भक्तिभावप्रेरित औचित्य, रुक्मिणीच्या मूळ सप्तश्लोकी पत्रिकेचा तिची कृष्णमीलनविषयक उत्कंठा प्रकर्षाने प्रकट करणारा ६३ ओव्यांत केलेला रसिकतापूर्ण विस्तार, **'तो ब्राह्मण नव्हेचि निश्चित। मूर्तिमंत भीमकीचा भावार्थ।'** ह्यासारखी सुंदर अपन्हुति किंवा बळिभद्रावर कुळवंटाचा आरोप करून, सांग रूपक-अशासारखीं सौंदर्यस्थळें 'स्वयंवरां'त बरींचशीं आहेत, हें नमूद करणें आवश्यक आहे.

रसाविष्काराच्या आणि अलंकारयोजनेच्या दृष्टीने धवळे व स्वयंवर ह्यांची तुलना आणखी विस्ताराने करणें शक्य आहे व आवश्यकहि आहे. पण विस्तारभयास्तव तें तूर्त रहित ठेवतों. तरीपण कथानकाच्या गुंफणींतील पकड व गतिमानता आणि व्यक्तिदर्शनांतील स्वाभाविकता ह्या कथनात्मक कवितेच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तंत्रांतील दोन प्रमुख घटकांचाच विचार केला, तर काव्यदृष्ट्या स्वयंवरापेक्षा धवळे निःसंशय सरस आहेत, असा निर्णय द्यावा लागतो; आणि हा निर्णय देत असतांनाच 'विद्वत्ता ही कवित्वाला पोषक नाही' अशा आशयाचा मेकॉलेचा व विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी उचलून धरलेला सिद्धान्त, खरा तर नसेल ना, अशी शंका उगीचच मनांत डोकावून जाते.

गुप्त सरस्वती (साहित्यिकांचीं पत्रें)

प्रा. गणेश श्रीपाद हुपरीकर, एम्. ए.

प्रा. ग. श्री. हुपरीकर ऊर्फ कवि 'विरागी' यांचीं रा. के. जी. नारखेडे यांस पत्रें

(१)

कोल्हापूर
ता. १७-१-१९२८

कोणत्याहि कवितेकडे तींतील प्रत्येक ओळ काव्यमय आहे की नाही, या दृष्टीने न पाहतां ती समग्र कविता मिळून कोणती मूर्ति घडते, व त्या मूर्तीत कोणत्या भावनेचा आत्मा स्थित आहे, या दृष्टीने तिच्याकडे पाहणें अवश्य असतें. एखाद्या सुंदर फुलाच्या सौंदर्याचा विचार करतेवेळीं त्याच्या केवळ एखाद्याच अवयवाकडे बघून भागणार नाही, तर त्या समग्र अवयवांचा-म्हणजे त्याच्या पाकळ्या, मृदुता, रंग इ. चा-समूह प्रमाणबद्धतेने त्या फुलाची एकच समग्र मूर्ति तयार करून तिच्या बाह्यसौंदर्यास कसा पोषक होतो, म्हणजे एकंदरींत ती मूर्ति कशी दिसते, तसेंच तिच्यांतून कोणतें तेज व कोणता सुगंध ओसंडून बाहेर पडतो, इ. गोष्टींचा अधिक विचार करावा लागतो. तसाच कोणत्याहि समग्र कवितेचा व कवितासमूहांचा विचार करणें इष्ट आहे. एखाद्या कवितेच्या केवळ विशिष्ट अंगाची चिकित्सा करीत बसणें म्हणजे चिरफाड [Dissection] करणें असून तें त्या कवितेच्या सौंदर्याचा विघात करणारें असतें. बरोबरच आहे की, गुलाबाचें संघटित सौंदर्य लुटण्याऐवजीं त्याची एक एक पाकळी आपण तोडून जर खाऊं लागलों, तर गुलाबाचें सौंदर्य राहील काय? किंवा गुलाबाचें फूल गुलकंदाच्या उपयोगीं पडतें, अशी उपयुक्ततावादी व्यावहारिक दृष्टि ठेवल्यास गुलाबाचें निसर्गसौंदर्य आपणांस प्रतीत होईल काय? अर्थात् नाही. वैयक्तिक विशिष्ट कवितांगाच्या चिकित्सेपेक्षा सर्व अंगांची मिळून संकलितकवितामूर्ति व तिच्यांत खेळणारा भावनारूप प्राण या दृष्टीनें काव्याचें रसग्रहण करणें ही गोष्ट इंग्रजी समीक्षाशास्त्रांत महत्त्वाची गणली जाते. आपल्या इकडे हिचा अत्यंताभाव आहे, असें नाही. कवितेंतील रसप्राधान्याचा विचार करीत असतां, आपल्याकडेहि संकलनात्मक समीक्षेचा (Synthetic criticism) आश्रय केला जातो. पण एकंदरींत कवितेच्या एकरसात्मक प्रतीतीपेक्षा तिच्यांतील शब्दालंकार व अर्थालंकार यांचीच छाननी संस्कृतवाङ्मयांत अधिक झाली आहे. तेव्हा एकरसात्मक प्रतीतीचा—एकवाक्यतात्मक दृष्टीच्या रसग्रहणपद्धतीचा-आपल्याकडे अधिक प्रघात पडणें इष्ट आहे. सारांश, कोणत्याहि कवितेकडे पृथक्करणपद्धतीने (Analytically) न पाहतां संकलनात्मक पद्धतीनें [Synthetically] पाहणें अवश्य आहे. अशा रीतीने एखादी विशिष्ट कविता अथवा सर्व कवितांचा समुच्चय साकल्याने पाहून त्या त्या कवीची विशिष्ट मनोरचना (Mould of mind) कशी आहे, व ती मनोरचना काव्यकलेच्या (Poetic art च्या) रूपाने कशी आविष्कृत होते, हें चांगलें समजून येतें.

एकाच कवितेच्या प्रमाणबद्ध मूर्तीचें संकलनात्मक दृष्टीने निरीक्षण करीत असतां, तिच्यांत आरंभापासून शेवटपर्यंत एकच भावना प्रतीत होते अथवा झाली पाहिजे. या प्रमुख भावनेच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंगोपांगांचा निरनिराळ्या तत्पोषक कल्पनांच्या द्वारें कवितेच्या निरनिराळ्या कडव्यांतून विस्तार केला जातो. हा विस्तार विविध प्रकारांनी जरी केला, तरी त्याची कवितेच्या ध्रुवपदाशीं संगति ठेवून प्रमुख भावनेच्या पुनरुक्तीनें कवितेची परिणामकारकता वाढविली जाते. येथे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, कवितेची प्रमुख भावना तिच्या ध्रुवपदांतच व्यक्त होते किंवा झाली पाहिजे. म्हणून या प्रमुख भावनेचा ध्रुवपदाच्या रूपानें वारंवार उच्चार करण्यांत पुनरुक्तिदोष घडत नसून, उलट हृदयावर भावनैक्यसाधक ठळक संस्कार उमटतो. तेव्हा पर्यायानें एकच भावना विविध कल्पनांच्या द्वारा प्रकट करणें हा एक शिष्टसंमत काव्यप्रकारच आहे. हा प्रकार वृत्तात्मक कवितेपेक्षा पदांतून (Songs) अधिक आढळतो. अशा रीतीनें हृदयाच्या भिन्न वृत्तींच्या द्योतक अशा सुरांचें शेवटीं ध्रुवपदरूप एका सुरांत पर्यवसान होत असतें, व कवितेच्या हेत्वैक्याचें पोषण होतें. हृदयांतून बाहेर उमटणाऱ्या गाण्यांत सुरांचे निरनिराळे आरोहावरोह असले, तरी तें गाणें ज्या मूळ सुरांतून उद्भवलें, त्याच सुरांत पुनः येऊन मिळण्यांत गानकौशल्याची पूर्णता सिद्ध होते. अर्थात् त्या गाण्याचें प्रमुख भावनारूप ध्रुवपद एकच असणार, व तें वारंवार घोळून म्हणणें हें सौंदर्यपोषक व आनंददायीच असतें. अन्य तऱ्हेनें सांगावयाचें म्हणजे वर्तुलाची वक्र रेषा मध्यबिंदूच्या भोंवती जवळ किंवा दूर कितीहि फिरूं शकली, तरी तिचा मध्यबिंदु एकच असतो; याच रीतीनें कवितेचीं वेगवेगळीं कडवीं हीं एकाच प्रमुख भावनारूप मध्यबिंदूभोंवती जवळ व दूर काढलेलीं वर्तुळेंच होत. तेव्हा कवितेच्या रसग्रहणाच्या बाबतींत ही संकलनात्मक दृष्टि ठेवली, तरच तिच्या अंतःसौंदर्याचें आकलन होतें. अर्थात् अलंकारादि बाह्यांगांचा कवितेच्या अंतःसौंदर्यांत विघात न होईल अशा रीतीनें गौणपणें विचार करण्यास हरकत नसते; पण मुख्य दृष्टि रसपरिपोषावरच ठेवणें इष्ट आहे.

(२)

कोल्हापूर
ता. ३०–३–१९३५

माझें असें मत आहे कीं, अंतःकरणांतील असंख्य, अस्थिर व अशुद्ध विकार म्हणजे कांही भावना नव्हत; व हे विकार जसे उसळतात, तसेच वाङ्मयांत प्रकट केल्यास तें वाङ्मय उच्चत्वाच्या कसास केव्हाहि लागणार नाही. अशुद्ध विकारांचें स्वरूप जाऊन शुद्ध भावनाजलाचें स्वरूप येण्यास विवेकाची निवळी अल्पस्वल्प प्रमाणांत हवी असते; व भावना शुद्ध स्वरूपांत प्रकट झाल्या, तरच खऱ्या वाङ्मयसौंदर्याचा परिपोष होतो. हल्लीच्या कांही उल्लू व थिल्लर लेखकांनी आपल्या वाङ्मयकृतींत अशुद्ध विकारांचें थैमान घालून, हे विकार म्हणजेच 'भावना' अशी चुकीची समजूत करून घेतली आहे; व हीच समजूत ते वारंवार लोकांपुढे बेडरपणें मांडीत असतात ! पाश्चिमात्य मानसशास्त्रांत संवेदना [Feeling], अस्थिरवृत्ति [Emotions] व स्थिरवृत्ति [Sentiments] यांत भेद केला असून आरंभींच्या दोन प्रकारच्या वृत्ति 'विकारां'च्या सदरांत पडतील. संवेदनेस अथवा अस्थिर वृत्तींस विवेकानें स्थिर स्वरूप आलें म्हणजेच त्यांस Sentiments असें म्हणतात; व अशा स्थिर भावना [Sentiments] अथवा शुद्ध वृत्तिच वाङ्मयांत येण्यास योग्य असतात. कोणत्या भावना वाङ्मयांत मांडण्यास योग्य अथवा अयोग्य असतात, व त्या कोणत्या शैलीनें मांडाव्या हें ठरविण्यास काव्यास सुद्धा किंचित् विवेकाचें-तर्काचें-साहाय्य घ्यावें लागतें. ही विवेकनिष्ठता सुद्धा भावनेच्या आविष्कारासमवेत अप्रत्यक्ष तत्त्वसूचन (तत्त्वप्रतिपादन नव्हे) कसें करावें, हें ठरविण्यास उपयोगी पडते.

हें अप्रत्यक्ष तत्त्वसूचन काव्यसौंदर्यास केव्हाहि मारक नसून, उलट पोषकच असतें. काव्याच्या उत्तमत्वाची कसोटी जी 'व्यंजना' ती या अप्रत्यक्ष तत्त्वसूचनानें सफल होते. काव्यांत सत्याची [अर्थात् काव्यगत सत्याची म्हणजे Poetic truth ची] चाड बाळगणें अत्यंत अवश्य आहे;

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व जें सत्य तेंच सुंदर [Beautiful] व शिव [Good] असतें. तसेंच, या तीन्हींचें अन्तर्गत ऐक्य जाणून वाङ्मयनिर्मिति करण्यांतच एखाद्या साहित्यिकाच्या अंतर्मुखतेची, अतएव श्रेष्ठत्वाची, कसोटी लागते. ही अंतर्मुखता म्हणजेच तात्त्विकता असें जरी म्हटलें, तरी ही तात्त्विकता श्रेष्ठ वाङ्मयास आवश्यकच असते. तसें जर न मानलें, तर केवळ बहिर्मुख वाङ्मयच श्रेष्ठ मानावें लागेल! पण जगांतील उत्तम वाङ्मयकृति बाह्याकडून अंतर्मुखतेकडेच वळतात, असें दिसून येतें.

ही अंतर्मुखता वृद्धत्वांतच येते व तारुण्यांत नसावी, असा दंडक कोणासहि घालतां येणार नाही. कारण आंतरिक विकास अमक्याच वयांत व्हावा, असें कोणीहि ठरवूं शकत नाही. पूर्वसंस्कार, शिक्षण व इतर विशिष्ट परिस्थिति इत्यादिकांमुळे एखादा तारुण्यांत–किंबहुना बाल्यांतहि–अंतर्मुखतेकडे वळेल, यांत असंभवनीय कांही नाही. ध्रुवाचें उदाहरण पौराणिक म्हणून सोडून दिलें, तरी गौतमबुद्ध, शंकराचार्य, ज्ञानेश्वर यांचीं उदाहरणें वरील मुद्दाच सिद्ध करतात.

संपादकीय

(लेखन ता. ५ जून १९४६)

'युगवाणी 'चें स्वागत उत्तम प्रकारें होत आहे, हें वाचकांस कळविण्यास मला समाधान वाटतें. नियतकालिकांतील अभिप्राय व मला आलेलीं पत्रें यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. बहुतेक अभिप्रायलेखक व पत्रलेखक यांनी 'युगवाणी' वर अभिप्राय देतांना व्यक्तिशः माझ्याबद्दलहि गौरवोद्गार काढले आहेत. त्यांस मी पात्र नसलों, तथापि त्यांबद्दल सर्वांचे जाहीर आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

अर्थात् 'युगवाणीं' त सुधारणेस अवकाश नाही, असें मी समजत नाहीं. उलट, तिच्यांतील उणिवांची मला पुरेपूर जाणीव आहे. अनुकूलतेप्रमाणे 'युगवाणीं' त वेळोवेळीं सुधारणा करण्याचा प्रयत्न अवश्य होईल, एवढेंच मी म्हणूं शकतों.

थोडा खुलासा

या ठिकाणीं एक दोन बाबींचा खुलासा करावयास पाहिजे. 'युगवाणीं' त परभाषांतील लघुकथांचा अनुवाद देण्यावर मीं भर देण्याचें ठरविलें आहे, हें किित्येकांस नापसंत असलेलें दिसतें. त्यांना हें कळत नाही की, कोणत्याहि देशांतील— किंवा प्रांतांतील-वाङ्मय समृद्ध होण्यास उत्तमोत्तम परकृतींच्या अनुवादांचें बहुमोल साहाय्य होतें. 'माडर्न रिव्ह्यू' च्या मे १९४६ च्या अंकांतील संपादकीय टिपणांत तुर्कस्थानमधील प्रचलित साहित्याबद्दल माहिती आलेली आहे. तिजवरून स्पष्ट दिसतें की, तुर्की भाषेंत युरोपीय श्रेष्ठ ग्रंथांचीं भाषांतरें फार मोठ्या प्रमाणांत करण्यांत आलीं. या भाषांतरांमुळे खुद्द तुर्की लेखकांस नवे विचार, नवें तंत्र वगैरे बाबतींत केवढी प्रेरणा मिळाली असेल, हें कल्पनेने सुद्धा जाणतां येतें! मराठींतहि अशींच विपुल भाषांतरें होत गेल्यास आपल्याकडील लेखकांना तोच अनुभव कां येऊं नये?

अनुवादांत मुळांतील नांवें व वातावरण कायम ठेवण्यावर माझा विशेष कटाक्ष आहे. मुळांतील पात्रांचें महाराष्ट्रीकरण करणें नेहमीच यशस्वी होऊं शकत नाही. खेरीज, मूळ नांवें व वातावरण कायम ठेवल्याने परकियांच्या समाजस्थितीचें थोडेंबहुत दर्शन होतें, हा लाभ दवडण्यांत काय अर्थ आहे?

आता, मुळाबरहुकूम भाषांतर केल्याने क्वचित् रूक्षता येते, असें कुणास वाटेल. पण तथाकथित सरसतेच्या नांवाखाली मुळास सोडून केलेल्या सैराट भाषांतराचें समर्थन बिलकूल होऊं शकत नाही! कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या 'द्राक्षकन्ये' पेक्षा कै. ज. के. उपाध्ये यांच्या 'रुबाया' सरस आहेत, असें म्हणण्याची वऱ्हाड-मध्यप्रांतांत प्रथा पडली आहे! पण उपाध्ये यांनी फिट्झेरॉल्डचें पुस्तक नीट समजावून न घेतां-किंवा त्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष्य करून-हा अनुवाद केला की काय, याची वारंवार शंका येते! मूळ नांवें व वातावरण कायम ठेवूनहि अनुवाद किती फक्कड होऊं शकतो, हें प्रा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ना. सी. फडके यांच्या 'नमुनेदार गोष्टी' या पुस्तकावरून अनुभवास येईल.

स्वतः मला भाषांतराचें इतकें महत्त्व वाटतें की, मराठींत केवळ भाषांतरास वाहिलेलेंच मासिक असावें, असें मला नेहमी वाटतें.

खुलासा करण्याजोगी दुसरी बाब म्हटली, म्हणजे साहित्यिकांचा परिचय हें सदर होय. या सदरांत थोर थोर साहित्यिकांचें वाङ्मयीन व सार्वजनिक कार्य यांचा थोडक्यांत आढावा घेण्याचें ठरलेलें आहे. हा आढावा घेतांना व्यक्तिगत माहिती फारशी न आली तरी चालेल, असें धोरण ठेवलेलें आहे. शिवाय, स्थलसंकोचाची मर्यादा आहेच! अशा स्थितींत हे परिचय कित्येकदा स्वभावचित्रांसारखे न वाटल्यास त्यांत नवल तें काय? या परिचय-लेखांची 'जात' स्वभावचित्रांपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे, हें येथे नमूद केलें पाहिजे. आजच्या अंकांतील "स्वयंभू माडखोलकर" या लेखासारखे कांही थोडे लेख स्वभावचित्रवजा उतरले असतील, ही गोष्ट वेगळी.

'साहित्यिकांचा परिचय' या सदरांत सवंग लोकप्रियतेपासून दूर पळणाऱ्या, पण भरीव कार्य केलेल्या साहित्यिकांचा परामर्ष घेण्यांत येत आहे. अर्थात् त्यांच्या कार्याचा एका ठिकाणीं आढावा घेतल्यास तो अभ्यासकांना उपयुक्त होणार नाही काय?

या सदरांतील लेखांकडे वाचकांनी या दृष्टीने पाहिल्यास त्यांची निराशा होणार नाही, अशी आशा आहे.

संयुक्त-महाराष्ट्र-समिति

बेळगांवच्या साहित्य संमेलनांत संयुक्त-महाराष्ट्र-समिति नेमण्यांत येऊन तिजवर प्रा. पोतदार, रा. माडखोलकर, देव, जेधे व नवरे हे सभासद नेमण्यांत आले, मुंबई व वऱ्हाड-मध्यप्रांत यांतील सर्व सलग मराठी प्रदेश, मराठवाडा, गोमंतक आणि महाराष्ट्राच्या चतुःसीमांतील सर्व मराठी संस्थानें यांचा संयुक्त प्रांत निर्माण करण्यांत यावा हें या समितीचें उद्दिष्ट आहे. संयुक्तमहाराष्ट्रनिर्मितीच्या कल्पनेस महाराष्ट्रांतील बहुतेक काँग्रेस पुढाऱ्यांनी पाठिंबा दिलेला आहे, हीं समाधानाची गोष्ट आहे.

समितीच्या कार्यास उत्साहाने सुरवात झाली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चतुःसीमा ठरविण्याचें कार्य समितीने तातडीने हातीं घेतलें आहे. या कार्याचें महत्त्व लक्ष्यांत घेऊन महाराष्ट्राच्या सर्व भागांतील कार्यकर्त्यांनी आपापल्या तालुक्याची व जिल्ह्याची माहिती समितीस अवश्य पुरवावी.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या मुळाशीं शेजारच्या अन्यभाषी प्रदेशांवर आक्रमण करावें, ही भावना बिलकूल नाहीं. या चळवळींत ज्यांना एक प्रकारच्या पाकिस्तानचा वास येतो, त्यांचें घ्राणेंद्रिय तज्ज्ञांकडून तपासून घेतलें पाहिजे, असें म्हणणें प्राप्त आहे! तसेंच, संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्याने मराठा समाजाचें वर्चस्व प्रस्थापित होण्याची ज्यांना भीति वाटते, त्यांच्या जातीयतेची तारीफ केली पाहिजे! महाराष्ट्रांत मराठा किंवा कुणबी समाज, जर संख्येनें मोठा आहे, तर त्याचें त्यावर वर्चस्व हें राहणारच. आमच्यांतील सुबुद्ध इसमहि लोकशाहीच्या तत्त्वास सोडून असलेलीं मतें कशीं उराशीं बाळगतात, याचा हा नमुना आहे! 'तरुण भारत' च्या ५ जूनच्या अंकांतील अग्रलेखांत याबाबत जे विचार प्रदर्शित केले आहेत, त्यांजशीं मी पूर्णपणें सहमत आहें. प्रांतीयता किंवा जातीयता अजिबात दूर करून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नास मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्याने जोराने उचलून धरावयास पाहिजे.

कै. वासुदेव वामन फडणीस

रा. फडणीस हे दिवंगत झाल्याचें आता सर्वविश्रुत झालेंच आहे. फडणीस हे एक अव्वल दर्जाचे भाषाप्रभु होते. मध्यम वयाच्या पिढींत जे थोडे 'शैलीकार' होऊन गेले व आहेत, त्यांत त्यांची गणना होत असे. भाषाप्रभुत्वास उत्कट स्वातंत्र्यप्रीतीची जोड लाभल्यामुळे फडणिसांचें लेखन ओजो गुणाने नुसतें रसरसलेलें असे! 'वागीश्वरी,' 'सावधान' इत्यादि नियतकालिकांतील फडणिसांचे राजकीय लेख म्हणजे राजकारणपर 'अक्षर' वाङ्मयच होय. त्यांचें साहित्यविषयक लेखनहि त्यांच्या राजकीय लेखनाइतकेंच प्रभावशाली आहे.

आश्चर्याची गोष्ट ही की, फडणीस यांनी आपलें बहुतेक लेखन निनांवी केलें. प्रसिद्धिपराङ्मुखतेबाबत फडणिसांनी उच्चांक गाठला, असें म्हटलें पाहिजे. निकटच्या मित्रांखेरीज— आणि कांही रसिकांखेरीज— फडणिसांच्या लेखनपटुत्वाची बाहेर फारशी माहिती नव्हती. रा. पु. मा. भावे यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपलें, 'रक्त व अश्रु' हें पुस्तक फडणिसांच्या लेखणीस अर्पण केलें आहे. त्या पुस्तकाची प्रस्तावना वाचून "हे कोण बुवा फडणीस?"— असे उद्गार पुष्कळांनी काढलेले मीं ऐकले आहेत.

'युगवाणी' च्या माझ्या एक वर्षाच्या कारकीर्दीत ज्या बारा साहित्यिकांचे परिचय-लेख देण्याचें मीं ठरविलें होतें, त्यांत फडणीस हेहि होते. या थोर भाषाप्रभूविषयीं मला वाटणारा आदर त्याच्या हयातींत अशा परिचय-लेखाच्या रूपानें व्यक्त करण्याची संधि मी साधूं शकलों नाहीं, याची मला नेहमीच हळहळ वाटत राहील.

फडणिसांचें जीवन-चरित्र व वाङ्मय-कार्य यांचा आढावा घेणारा लेख 'युगवाणीं 'त यथावकाश प्रसिद्ध होईल.

कै. आगरकरांचें पत्र

'युगवाणी 'च्या प्रथमांकांत कै. गोपाळराव आगरकर यांचें पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांतील पान २८ ओळ ३१ येथील ग्रामनाम कागद फाटल्याने मला लागलें नाहीं. तें गांव केडगांवच्या अलीकडील 'यवत' किंवा 'यवतें' नामक स्टेशन असावें, असें रा. म. दा. साठे, एम्. ए. एल्. टी, पुणें, हे कळवितात. पत्रांतील वर्णन या गांवास लागूं पडतें व दम्याचे रोगी तेथे आजहि जातात, असें रा. साठे कळवितात. वाचकांनी त्या पत्रांत ही सुधारणा करून घ्यावी.

संघवार्ता

(सरचिटणिसाकडून)

'युगवाणी 'च्या प्रथमांकांत जाहीर केल्याप्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांची पूर्वी जी यादी प्रसिद्ध करण्यांत आली होती, त्यानन्तर झालेल्या **पहिल्या वर्गाच्या सभासदांचीं** नांवें खालीं प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. ही यादी सुद्धा संपूर्ण नसून या अंकांत जेवढीं मावलीं तेवढींच नांवें दिलीं आहेत. या वर्गांतील उरलेलीं नांवें आणि दुसऱ्या वर्गांतील सभासदांचीं नांवें स्थलानुरूप 'युगवाणीं 'त प्रसिद्ध होतील.

१ रा. त्र्यं. ह. काळेमोर, पारवा जहागीर
२ ,, बापूराव महादेवराव देशमुख, अमरावती
३ कु. चंद्रप्रभा कुकडे, नागपूर
४ ,, कमल समेळ, नागपूर
५ ,, सिन्धु देशमुख, नागपूर
६ ,, कमल श्री. मुनशी, नागपूर
७ रा. गुणवन्त कृष्णराव देशमुख, सालिमपूर
८ ,, देविदास विनायक अडावदकर, खामगांव
९ ,, भी. गो. देशपांडे, वर्धा
१० प्रि. वि. प्र. मोहगांवकर, वाशीम
११ रा. व. ना. एकबोटे, उमरखेड
१२ ,, प्र. रा. कासलीकर, पारवा ज.
१३ सौ. प्रमिलाताई शास्त्री, नागपूर
१४ ,, मालतीबाई शिरखेडकर, नागपूर
१५ रा. लहानु बारलु पडोळे, नागपूर
१६ प्रा. म. श्री. पंडीत, नागपूर
१७ रा. म. मा. नावलेकर, नागपूर
१८ प्रा. कृ. शं नाडगोंडा, नागपूर
१९ रा. म. रा. खोलकुटे, नागपूर
२० डॉ. शं. दा. पेंडसे, नागपूर
२१ रा. शं. रा लोंढे, अमरावती
२२ ,, पुंडलीकराव पाटील, अकोला
२३ ,, अंबादास शंकर हातेकर, अकोला
२४ ,, जी. बी. पाचपोर, अकोला
२५ प्रा. नारायण रामचंद्र केळकर, अकोला
२६ प्रि. गणेश दत्तात्रय जोशी, अकोला
२७ रा. गोपाळ काशीनाथ जोशी, अकोला
२८ ,, दत्तात्रय नरसिंह वाडदेकर, अकोला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

२९ रा. वामन लक्ष्मण डोळे, अमरावती
३० ,, नारायण गोपाळ जोशी, अमरावती
३१ ,, डी. जी. अनगळ, अमरावती
३२ सौ. शारदाबाई अनगळ, अमरावती
३३ रा. द. चिं. सोमण, वाशीम
३४ डॉ. वासुदेव नारायण पंडित, वाशीम
३५ रा. गजानन त्र्यंबक माडखोलकर, नागपूर
३६ ,, शं. बा. शास्त्री, नागपूर
३७ ,, अनंत बापूजी चितळे, अमरावती
३८ प्रिं. वा. वि. मिराशी, नागपूर
३९ रा. एल्. व्ही. एकलारे, पुसद
४० प्रा. वामन कृष्ण चोरघडे, वर्धा
४१ डॉ. न. अ. वरवे, तळेगांव
४२ न्या. मू. वा. रा. पुराणिक, नागपूर
४३ रा. ए. ज. मोहरीर, नागपूर
४४ ,, शंकर शामराव बुट, नागपूर
४५ ,, शं. त्र्यं. धर्माधिकारी, वर्धा
४६ प्रिं. श्री. ल. पांढरीपांडे, नागपूर
४७ प्रा. पां. कृ. सावळापूरकर, नागपूर
४८ रा. म. श्री. मंगरूळकर, नागपूर
४९ ,, गो. न. कानेटकर, एलिचपूर
५० कॅप्टन वा. ग. पाठक, झांशी
५१ सौ. विमल पाठक, अमरावती
५२ श्री. मनोहर विश्वनाथ व्यवहारे, पुसद

वऱ्हाड-मध्यप्रांत व निजाम राज्य या विभागांतील
एकमेव मराठी वर्तमानपत्र

मातृभूमि

कार्यालय — अकोला (वऱ्हाड)

WANTED

B. Sc. and B. A. teachers. Apply Sharp to the Head-master, **Prabodhan Vidyalaya**, Daryapur, Dist. Amraoti (Berar).

हें मासिक रा० **तु. मा. पाटील** यांनी श्री० ह. व्या. प्र. मंडळाच्या सरस्वती मुद्रणालयांत छापलें व प्रा० **ना. कृ. दिवाणजी**, एम्. ए., सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ यांनी अमरावती येथे संघाच्या कार्यालयांत प्रसिद्ध केलें.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे ग्रंथ

ज्ञानोपासना आणि भारतीयांचें कर्तव्य (दुसरी आवृत्ति) किं. २ रु.
सध्याच्या राष्ट्रीय जागृतीच्या काळीं या ग्रंथाचें वाचन प्रत्येकानें करणें अवश्य आहे.

मयूरकाव्यविवेचन किं. २॥. रु.
कविवर्य मोरोपंतांवरील प्रमाणभूत ग्रंथ

एकावळी किं. १॥ रु.
विख्यात साहित्यिकांचीं सुंदर व्यक्तिचित्रें

विष्णुपदी किं. ४ रु.
विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे संकलित लेख–सुमारें ३०० पानें दुर्मिळ व अप्रसिद्ध मजकूर.

....

'युगवाणी' मासिकाचे संपादक
रा. वामन नारायण देशपांडे यांचा काव्यसंग्रह

आराधना—
महाविदर्भांत सर्वोत्कृष्ट ठरून नागपूर विद्यापीठातर्फे क. ना. बेहेरे पारितोषिक, मिळविणारा सर्वोत्कृष्ट काव्य–ग्रंथ.

फक्त १० रु. मनीऑर्डरीनें पाठविणारांस वरील ग्रंथ रजिस्टर्ड पोस्टानें घरपोंच पाठविण्यांत येतील.

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०
काँग्रेसनगर, नागपूर.

वऱ्हाड-मध्यप्रांतांतील सर्वांत जुनें आणि एकमेव मराठी शैक्षणिक मासिक

वर्ष ७२ वें] **वऱ्हाडशाळापत्रक** [वा. व. फक्त रु. २॥.

संपादक— रा. रा. द. देशपांडे

या शैक्षणिक मासिकाचे आजच वर्गणीदार व्हा ! !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ